www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ५२ | शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




# ग्लोबोकॅन च्या माहितीनुसार भारतातील महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक

## ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस साठी अपोलोचा 'चेक-ओलेट' अनोखा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**

**मुंबई :** ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस महिन्यात, अपोलो कॅन्सर सेंटर्स ने 'चेक-ओलेट' हा अनोखा उपक्रम सुरू केला आहे एक गोड पदार्थ जो स्वतःची काळजी घेण्याची गोड आठवण देतो.ग्लोबोकॅन च्या माहितीनुसार, भारतातील महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक असून, सर्व नवीन कर्करोग प्रकरणांपैकी १३.५% आणि कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी १०.६% प्रकरणे याच कर्करोगाची आहेत. या वाढत्या प्रमाणानुसारही फक्त १.६% (NCBI) महिला, वय ३०–६९ वर्षे, यांनी कधीही स्क्रीनिंग केलेले आहे. या चिंताजनक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर, अपोलो कॅन्सर सेंटर्सचा उद्देश 'चेक-ओलेट'च्या माध्यमातून स्वयं-देखभालीला सामान्य करण्याचा आणि महिलांना दरमहा स्वतःच्या स्तनांची तपासणी करण्याची सवय लावून त्यांना त्यांच्या आरोग्यावर लवकर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा आहे.'चेक-ओलेट' हा फक्त ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस महिन्यातील उपक्रम नाही तर महिलांना त्यांच्या आरोग्यावर पुन्हा नियंत्रण मिळवण्यासाठी प्रोत्साहित करणारी चळवळ आहे. एका साध्या, गोड क्षणाला स्वतःच्या काळजीसाठी सौम्य ढकल्यात रूपांतरित करून, अपोलो कॅन्सर सेंटर्स आरोग्य जागरूकतेचा संवाद अधिक सहानुभूतीपूर्ण, सर्जनशील आणि अर्थपूर्ण बनवते. प्रत्येक डार्क चॉकलेट बार (चेक-ओलेट) वर एक QR कोड आहे, जो स्कॅन केल्यावर महिलांसाठी स्तनांची स्वतः तपासणी कशी करावी यावर आधारित ॲनिमेटेड व्हिडिओ दाखवतो.






डॉ. प्रीथा रेड्डी, एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअरपर्सन, अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्रायझेस लि. म्हणाल्या,"जेव्हा महिला निरोगी असतात, तेव्हा राष्ट्र समृद्ध होते. प्रत्येक महिलेचे आरोग्य हे कुटुंब, समाज आणि अर्थव्यवस्था यांना बळकट करणारे शक्तीगुणक आहे. महिलांच्या आरोग्यातील दरी भरून काढल्यास २०४० पर्यंत जागतिक अर्थव्यवस्थेला दरवर्षी सुमारे १ ट्रिलियन डॉलर्सची भर पडू शकते. अपोलोमध्ये आम्ही महिलांच्या आरोग्याकडे राष्ट्रीय प्राधान्य आणि सामूहिक जबाबदारी म्हणून पाहतो. अपोलो कॅन्सर सेंटर्समार्फत आम्ही लवकर निदान, योग्य वेळेवर उपचार आणि सक्रिय आरोग्याची संस्कृती निर्माण करण्यावर भर देत आहोत. 'चेक-ओलेट' हा त्या दिशेने एक अर्थपूर्ण टप्पा आहे जो प्रत्येक महिलेला आठवण करून देतो की स्वतःची काळजी घेणे ही विलासिता नसून, ती शक्ती आहे जी आरोग्यदायी, मजबूत आणि समृद्ध भारताला इंधन पुरवते."

तिस्का चोप्रा, अभिनेत्री-लेखिका म्हणाल्या,"सर्वांनाच चॉकलेट आवडते ते आपल्याला आनंद, उब आणि समाधान देते. 'चेक-ओलेट' खास आहे कारण ते या आवडीच्या गोष्टीला महिलांसाठी स्वतःकडे लक्ष देण्याच्या सौम्य आठवणीत रूपांतरित करते. एका साध्या डार्क चॉकलेटच्या तुकड्यातून, हा उपक्रम महिलांना नियमितपणे स्तनांची स्वतः तपासणी करण्यासाठी प्रोत्साहित करतो. ही जागरूकतेला कृतीत बदलण्याची आणि महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी सजग बनवण्याची अत्यंत सर्जनशील आणि विचारपूर्वक कल्पना आहे."

डॉ.नीता नायर, लीड कन्सल्टंट, ब्रेस्ट ऑन्कोलॉजिस्ट, अपोलो कॅन्सर सेंटर्स, नवी मुंबई म्हणाल्या,"स्तनाच्या कर्करोगाच्या बाबतीत लवकर निदान फक्त महत्त्वाचे नाही ते जीव वाचवणारे आहे. अपोलो कॅन्सर सेंटर्समध्ये आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे की कशाप्रकारे योग्य वेळी स्क्रीनिंग आणि जागरूकतेमुळे अनेक महिलांचे प्राण वाचले आहेत.

'चेक-ओलेट' ही आमची अशीच एक प्रयत्नशील पद्धत आहे जी महिलांना आरोग्याकडे सक्रिय दृष्टिकोनातून पाहण्यासाठी प्रोत्साहित करते. डार्क चॉकलेट जे ॲंटिऑक्सिडंट्स आणि मूड सुधारण्याच्या गुणांसाठी ओळखले जाते या उपक्रमात काळजीचा संदेशवाहक बनते, आणि प्रत्येक महिलेला आठवण करून देते की महिन्यातील काही मिनिटे स्वतःची तपासणी करण्यासाठी देणे मोठा फरक घडवू शकते. या संदेशाला सुलभ आणि संबंधित बनवून आम्ही भीतीच्या जागी जागरूकता आणि कृती आणण्याचा प्रयत्न करतो."

आरोग्यविषयक लाभांसाठी ओळखले जाणारे डार्क चॉकलेट या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. NCBI नुसार, डार्क चॉकलेट ॲंटिऑक्सिडंट्स आणि फ्लॅव्होनॉइड्सने समृद्ध आहे, जे सूज कमी करण्यास, हृदयाचे आरोग्य सुधारण्यास आणि मन प्रसन्न ठेवण्यास मदत करतात. संशोधनात असेही दिसून आले आहे की हे त्वचा, हृदय आणि मेटाबॉलिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम घडवते म्हणजेच हा फक्त स्वादिष्ट पदार्थ नसून आरोग्याची काळजी घेणेही आनंददायी असू शकते, याची अर्थपूर्ण आठवण आहे.

# मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर शिवसेना शिंदे गटाला गळती सुरू

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**

**तळा :** महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष तथा रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या कार्यकर्तृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेचे दक्षिण रायगड उपजिल्हाप्रमुख तसेच माणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती रमेश मोरे, खरवली ग्रामपंचायत सरपंच संतोष खडतर, उपसरपंच, सदस्य, शिवसेना शाखाप्रमुख यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह मंगळवार 28 ऑक्टोबर रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये




जाहीर पक्ष प्रवेश केला. मागील काही दिवसापूर्वीच खांबवली आदिवासी बांधवांनी तसेच तळा तालुका भाजप सरचिटणीस खेळू वाझे यांनी भाजपला रामराम करत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून तळा माणगाव, पोलादपूर मधून झालेला पक्षप्रवेश निवडणुकीत गेम चेंजर ठरणार असे बोलले जात आहे. खा.सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणात पक्षांमध्ये नव्याने सामील झालेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत करून मान्यवरांना आगामी राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पदाधिकाऱ्यांनी पक्षाचे ध्येय धोरणे विचारधारा समोर ठेवून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला एकजुटीने सामोरे जाण्याचे आवाहन खासदार सुनील तटकरे यांनी केले. या कार्यक्रमास राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री कु. अदिती तटकरे, माजी आमदार श्री.अनिकेत भाई तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रायगड जिल्हा कार्याध्यक्ष श्री. सुभाष केकाने, रायगड जिल्हा प्रवक्ते श्री. ॲड.राजीव साबळे, महाडच्या माजी नगराध्यक्ष सौ. स्नेहल जगताप, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष श्री. मुस्ताक भाई अंतुले, सिद्धिविनायक ट्रस्ट चे विश्वस्त श्री.भास्कर विचारे यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरणच्या झटपट योजनेचा उद्योजकांना लाभ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू नागपूर विभाग**

**मुंबई :** घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक अशा सर्व वीज ग्राहकांना गरजेनुसार वीजवापर वाढविण्यासाठी महावितरणने झटपट स्वयंचलित परवानगी योजना राबविल्यामुळे राज्यातील ४,१६४ वीज ग्राहकांनी सुमारे एक महिन्यात २२ मेगावॅट क्षमता वाढवून घेतली. यामध्ये २४६० औद्योगिक वीज ग्राहकांचा समावेश असून दिवाळीपूर्वी मागणीनुसार उत्पादन वाढविण्यास त्यांना मदत झाली.

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, वीज ग्राहकांना अधिकाधिक सहजपणे सेवा मिळण्यासाठी प्रक्रियेत बदल करण्याची सूचना मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्यानुसार 'इज ऑफ लिव्हिंग'च्या सूत्रानुसार महावितरणने वीज ग्राहकांसाठी मंजूर भार वाढविण्यासाठी (लोड एनहान्समेंट) एक स्वयंचलित व्यवस्था सुरू केली आहे.

या योजनेमध्ये ग्राहक घरबसल्या महावितरणच्या मोबाईल ॲप्लिकेशन किंवा वेबसाईटवर अर्ज सादर करून आणि योग्य शुल्क भरून आपला मंजूर भार वाढवून घेऊ शकतात. ग्राहकाने शुल्क भरल्यानंतर ४८ तासात त्याला परवानगी असलेला मंजूर भार वाढवून दिला जातो.

महावितरणने ही सुविधा २६ सप्टेंबर रोजी सुरू केली. महिनाभरात राज्यातील ४,१६४ ग्राहकांनी नव्या सुविधेचा लाभ घेतला. त्यामध्ये सर्वाधिक २,४६० औद्योगिक वीज ग्राहक आहेत. घरगुती ग्राहकांची संख्या ९४२ असून ५०९ व्यावसायिक ग्राहकांनी सुविधेचा लाभ घेतला. याखेरीज २५३ अन्य ग्राहकांनाही लाभ झाला.

वीज ग्राहकांना महावितरणकडून कनेक्शन देताना त्यांच्या मागणीनुसार वीज वापराबाबतची क्षमता निश्चित केली जाते, त्याला मंजूर भार म्हणतात. औद्योगिक ग्राहकांना उत्पादनात वाढ होत असेल किंवा अधिक क्षमतेची यंत्र सामुग्री वापरायची असेल तर अधिक भार मंजूर करून घ्यावा लागतो. सामान्यतः घरगुती वीज ग्राहकांचा मंजूर भार दोन ते पाच किलोवॅट इतका असतो. ग्राहकांना एअर कंडिशनिंगसारख्या सुविधा बसविण्यासाठी भार वाढवून घ्यावा लागतो. महावितरणने सुरू केलेल्या नव्या सुविधेमुळे ग्राहकांना घरबसल्या ऑनलाईन सेवा उपलब्ध झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने गेल्या साडेतीन वर्षात वीज वितरण जाळे अधिक मजबूत केले आहे. तसेच ग्राहकांच्या वाढत्या गरजेनुसार वीज उपलब्ध होण्यासाठी वीज खरेदी करार केले आहेत. त्यामुळे महावितरण ग्राहकांच्या मागणीनुसार तातडीने अधिक भार मंजूर करू शकत आहे.

महावितरणच्या राज्यभरातील वीज ग्राहकांसाठी १ जुलैपासून नवीन वीजदर रचना लागू झाली आहे. प्रथमच सर्व प्रवर्गातील वीज ग्राहकांच्या वीज दरात कपात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना वीज वापरासाठी दरामध्ये अतिरिक्त सवलतही देण्यात येत आहे. त्याचा लाभ घेऊन अनेक वीज ग्राहकांचा वीज वापर वाढला आहे. त्यासाठी त्यांना त्यांच्या कनेक्शनसाठीचा भार वाढवून घेणे उपयुक्त ठरत आहे.

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचे माजी विद्यार्थी 14 वर्षांनी मेळाव्यानिमित्त एकत्र

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** सिल्लोड तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयामध्ये 2009/10 च्या बॅचचे विद्यार्थी यांचा स्नेहसंमेलन सोहळा शुक्रवारी दिनांक 24.10.2025 या रोजी जल्लोषात पार पाडला. तब्बल 14 वर्षांनी माजी विद्यार्थी एकत्र येत आठवणींना उजाळा मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक बीके पवार सर होते तसेच विशेष पाहुणे म्हणून सध्याचे मुख्याध्यापक दौंड सर होते.कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व आदरणीय शिक्षकांचा विद्यार्थ्यांनी सत्कार केला. सूत्रसंचालन माजी विद्यार्थी गणेश जाधव यांनी केले तर अक्षय पाटील यांनी आभार



मानले.बी.के. पवार सर यांनी एकत्र कुटुंबाचे महत्त्व सांगितले तसेच. दौंड सर यांनी सर्व विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले, चापे सर यांनी मोबाईलचा अतिवापर यामुळे होणारे नुकसान यावर आपले मत व्यक्त केले. आर.पी. सोनवणे सर यांनी शेती विषयी मार्गदर्शन केले, तसेच बनसोड सर यांनी सुसंस्कृत भावी पिढी घडविण्यासाठी मार्गदर्शन केले.

राजपूत सर यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी आपापला परिचय देत आपण सध्या कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहोत याची माहिती दिली सर्व शिक्षकांनीही त्यांना आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहात त्या क्षेत्राला न्याय देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी माजी विद्यार्थिनी कल्पना कुदळ (पाथ्रे),वर्षा मिरगे( पालोदकर) तसेच सचिन गव्हाणे श्रीराम ठाले दिलीप गावंडे या विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# ग्रुप ग्रामपंचायत महलमिऱ्या डोंगर मधील प्रधानमंत्री आवास योजनाचा भ्रष्टाचार उघडकीस सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी महलमिऱ्या यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पेण दीपक लोके**

पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत महलमिऱ्या डोंगर मधील प्रधानमंत्री आवास योजनाची माहिती गावातील सामाजिक कार्यकर्ते दामोदर जेधे यांनी माहिती अधिकार मधून मिळाली असता सन२०१६ पासून आजपर्यंत ग्रुप ग्रामपंचायत महलमिऱ्या डोंगरचे ग्राम पंचायत अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणात प्रधानमंत्री आवास योजना भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आला आहे

सदर लाभार्थ्यांना लाभ दिला आहे त्या लाभार्थ्यांची लाभ घेण्यापूर्वी पक्का स्वरूपात घरे असताना असेसमेंट पक्के घर नोंदी असताना ग्रामपंचायत अधिकारी यांनी आवास योजना लाभ दिला आहे सदर लाभार्थ्यांनी अधिकारी




यांच्याशी संगनमत करून जुन्या घरांना रंगरंगोटी किरकोळ दुरुस्ती करून नवीन घरे बांधली आहे असे भासवून फोटो काढून आवास योजना घरकुल पूर्ण केले शेरे ग्रामपंचायत अधिकारी यांनी अर्थिक फायदा केला आहे

शासन निर्णय प्रमाणे घरकुल बांधकाम करताना उप अभियंता याकडून बांधकाम पर्यवेक्षण केलेलें नाही लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना पैसे बँकेत जमा झाल्यावर सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी खाण्यातून पैसे काढून संगनमत करून वाटून घेतले आहे एकाच व्यक्तीला दरवर्षी लाभ दिलेले आहे तरी प्रधानमंत्री आवास योजनातील सन २०१६ ते आजपर्यंत मंजूर प्रकरणात सखोल चौकशी करून सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांवर गुन्हे दाखल करता दामोदर जेधे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती रायगड, जिल्हा पोलिस अधीक्षक रायगड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड, जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) याकडे ठोस पुरावे सहित तक्रार दाखल केली आहे तरी सदर प्रधानमंत्री आवास योजनातील लवकरच दोषी सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी महलमिऱ्या यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे

> तरी प्रधानमंत्री आवास योजनाची भक्कम पुरावे देऊन सुद्धा सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी महलमिऱ्या यावर गुन्हे दाखल न झाल्यास कोर्ट मार्फत केस दाखल करण्यात येऊन गुन्हे दाखल करण्यात येईल
> (ॲड.नागेश जगताप)



पाटोदा - श्रीकांत धसे यांच्या मेडिकल उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहुन त्यांना शुभेच्छा देताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. सोमीनाथ कोल्हे, पत्रकार संघाचे सचिव पत्रकार ॲड.महेश बेदरे, पत्रकार सतिष गर्जे, पत्रकार विजय जाधव सह इतर
(छाया-दैनिक युवक आधार पाटोदा.)

# धर्माबादमध्ये विकासाची नवी पहाट

## आमदार राजेश पवार यांच्या हस्ते कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सूर्यकार**

नायगाव मतदारसंघाचे कार्यसम्राट, विकासपुरुष आमदार राजेशदादा पवार यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाखाली धर्माबाद शहरात आज नगरपरिषदेच्या प्रांगणात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कोट्यवधी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदारांच्या हस्ते करण्यात आले. यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे 71 कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

धर्माबाद शहराच्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, नाली, विद्युतीकरण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांसारखी अनेक मूलभूत कामे मागील काळात आमदार



राजेश पवार यांच्या पुढाकाराने पूर्ण झाली आहेत. आता केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत 71 कोटींच्या खर्चाची जलयोजना राबविण्यात येणार असून, या योजनेचे भूमिपूजन आमदारांच्या हस्ते आज संपन्न झाले. त्याचप्रमाणे बाळापूर येथील छोट्या तलावाचे ट्रेकिंग पॉईंट व उद्यानाच्या कामांचा शुभारंभ देखील यावेळी करण्यात आला, जी धर्माबादकरांसाठी एक सुंदर भेट ठरली आहे.

आजच्या या कार्यक्रमात शहरातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण, गटार लाईन, पाणीपुरवठा सुविधा, वीजपुरवठा व्यवस्था, सार्वजनिक उद्याने व सामुदायिक सभागृहे अशा अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे भूमिपूजन करण्यात आले. या सर्व

**माजी शहराध्यक्ष रमेश अण्णा गौड यांचे प्रतिपादन**

**"धर्माबादच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी भारतीय जनता पक्षाने आपल्या खांद्यावर घेतली आहे. जनतेशी दिलेली वचने पूर्ण करणे आणि प्रत्येक नागरिकापर्यंत सुविधा पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे. शहरातील कोणताही भाग विकासापासून वंचित राहू नये, यासाठी भाजपा कटिबद्ध आहे. सुरू असलेल्या या विकासकामांमुळे धर्माबाद शहराचे रुप अधिक सुंदर, नियोजनबद्ध आणि टिकाऊ स्वरूपात घडेल, असा मला ठाम विश्वास आहे."**

कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, यामुळे धर्माबादच्या विकासाला नवे बळ मिळणार आहे.

या प्रसंगी आमदार राजेशदादा पवार म्हणाले की, "धर्माबाद शहरातील रस्ते, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेच्या समस्या दूर करून एक आदर्श शहर उभे करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. येत्या काळात आणखी मोठ्या विकासकामांना प्रारंभ होईल आणि केंद्र तसेच राज्य शासनाकडून अधिकाधिक निधी मिळवण्यासाठी मी स्वतः पुढाकार घेईन."

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार राजेश पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी धर्माबाद शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. कमलकिशोर काकाणी, माजी शहराध्यक्ष रमेश अण्णा गौड, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नागभूषण वर्णी, गोवर्धन मालू, श्रीनिवास इनानी, दत्ताहरी पाटील चोळाखेकर, भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष रवी अण्णा पोतगंटीवार, धर्माबाद मंडळाध्यक्ष चक्रेश पाटील बनाळीकर, तालुका अध्यक्ष गुलाब पाटील मोरे, विजय डांगे पाटील, संतोष पाटील मोरे, तसेच विविध विभागांचे अधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भूमिपूजनानंतर धर्माबादकर नागरिकांनी आमदार राजेश पवार यांचे मनःपूर्वक आभार मानले. नागरिकांनी सांगितले की "अनेक वर्षांपासून विकासाची आश्वासने दिली गेली, परंतु आज प्रत्यक्षात कामे होताना पाहून आम्हाला खऱ्या अर्थाने विकासाचा अनुभव येत आहे.

युवकांनी सार्वजनिक उद्याने आणि खेळाच्या मैदानांसाठी गती मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, समाधान आणि नव्या आशेचे वातावरण पाहायला मिळाले.

# वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे स्वागत



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर साहेब यांच्या नांदेड आगमनावेळी त्यांचे मनोभावे स्वागत करण्यात आले. या वेळी कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर यांनी ॲड. आंबेडकर यांच्याशी सदिच्छा भेट घेत सविस्तर चर्चा केली.

या भेटीवेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुख अहमद, जिल्हाध्यक्ष शिवकुमार नरंगले, ज्येष्ठ नेते माधवराव सुगावकर व प्रशांत इंगोले आदी उपस्थित होते.

भेटीदरम्यान सामाजिक व राजकीय घडामोडींसंदर्भात सविस्तर संवाद झाला. विविध स्तरांवरील जनतेच्या प्रश्नांवर उपाययोजना आणि भविष्यातील संघटनात्मक कामकाजावरही चर्चा झाली.या भेटीमुळे दोन्ही पक्षांमध्ये सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले असून, सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारांना बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# कोरल वाडी, आपटा तालुका पनवेल ग्रामस्थांच्या मागण्या मान्य केल्यामुळे आमरण उपोषण स्थगित

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी :**

सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर अध्यक्ष ग्रामविकास संवर्धन सामाजिक संस्था यांच्या नेतृत्वाखाली आज बुधवार दिनांक 29/10/2025 रोजी आयोजीत करण्यात आलेल्या आमरण उपोषणा च्या बैठकीमध्ये आपटा ग्रामपंचायत हद्दीतील जल जीवन मिशन योजनेतील पाणी पुरवठा योजने अंतर्गत असलेल्या कोरल वाडी आणि इतर वाड्यांच्या पाईप लाईन चे काम पुढील चार दिवसात पूर्ण करून देण्याचे आश्वासन पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता



पनवेल यांनी केले. दिनांक 4/11/2025 रोजी स्वतः उप विभागीय अधिकारीपवन चांडक यांच्या हस्ते त्याचे लोकापर्ण होणार आहे.

कोरळ वाडी वरील सर्व कुटुंबांचे अंत्योदय योजनेतील पिवळे रेशन कार्ड देण्यात आले, तसेच राहिलेल्या कुटुंबांचे रेशन कार्ड थोड्या दिवसात देण्यात येणार आहे. कोरळ वाडीला जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था पाहण्यासाठी उप विभागीय अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या टीम सोबत पाहणी दौरा ठेवला असून त्याच दिवशी योग्य ते आदेश दिले जातील असे आश्वासन देण्यात आले. सदरहू बैठकीस उप अभियंता पाणी पुरवठा विभाग, नायब तहसीलदार पुरवठा विभाग, सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील भोवड,उपस्थित होते. ॲड राजेंद्र मढवी यांनी सर्वांचे आभार मानले माहिती अधिकार कार्यकर्ते काशिनाथ जाधव , दिलीप मोरे , सुभाष मेहतर, सुभाष फडके,वाजीद शेख, रोहित ढमाल, गणेश थोरवे लाडीवली ग्रामपंचायत महेश पाटील, ग्रामस्थ बी. एस. कुलकर्णी गुरुदास वाघे ,संतोष पवार आदी कोरळवाडी , आपटा ग्रामस्थ उपस्थित होते.

# आष्टी तालुका साखर कामगार युनियनचे सदस्य नसताना देखील युनियनचे लेटर पॅड वापरून खोटी कार्यकारणी तात्काळ कार्यकारणी बरखास्त करा - सचिव एम.जी. पडोळे

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे**

कडा महेश सहकारी साखर कारखान्याची १ ऑक्टोंबर २०१० रोजी युनियन कार्यकारणी जाहीर झाली असून या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष उपाध्यक्ष सरचिटणीस यांच्यासह १७ जणांचा समावेश असून सेवेत नसलेले कामगार हे युनियनचे लेटर पॅड वापरून खोट्या नाट्यासह्या करून खोडसाळपणा करत आहेत १ ऑक्टोबर २०१० रोजी आष्टी तालुका साखर कामगार युनियन कार्यकारणी जाहीर झालेली असून ती कार्यकारिणीच ग्राह्य धरण्यात यावी व इतर स्वयंघोषित खोटे लेटर पॅड वापरून करण्यात आलेली कार्यकारणी तात्काळ बरखास्त करण्यात यावी अशी मागणी आष्टी तालुका साखर कामगार युनियनचे सचिव एम.जी पडोळे यांनी माध्यमांशी बोलताना केली आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने रितशीरपणे कारखान्यावरील कर्ज भरणा करून बँकेचे बेबाकी प्रमाणपत्र घेऊन ताबा मिळवला आहे. काही कर्मचारी सेवेत नसलेले कर्मचारी कामगार युनियनचे लेटर पॅड वापरून खोडसळपणा करीत आहेत.१ ऑक्टोबर २०१० रोजी आष्टी तालुका साखर कामगार युनियन यांची कार्यकारणी जाहीर झालेले असून या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष सुरेश गवळी, सरचिटणीस पाटील ए एस,उपाध्यक्ष एम.एस. नालकोल, सचिव एम.जी पडोळे,खजिनदार आर.एम जाधव, सदस्य बी.डी. आजबे, एल.जे राजगुरू, आर एम साखरे, बी

एस मस्के,एन के वाघुले, एन.जी धोंडे,एम. एस ढवन,बी आर पाणतावणे, एस बी वायभासे, झेड.डी जगताप, एन एस गवळी, एन बी साळुंके आदींचा या कार्यकारिणीमध्ये समावेश आहे. हीच कार्यकारणी आष्टी तालुका साखर कामगार युनियनची असून या अगोदर देखील याच कार्यकारिणीने २६ मार्च २०१२ रोजी साखर आयुक्त साखर आयुक्तालय पुणे यांच्याकडे कामगार युनियनचे लेटर पॅड वापरून खोट्या तक्रारी करत असल्याची तक्रार देखील याच संघटनेच्या वतीने करण्यात आली होती. त्यामुळे राजकीय हेतूने स्वयंघोषित कार्यकारणी असून हे कार्यकारणी तात्काळ बरखास्त करण्यात यावी अशी मागणी सचिव एम .जी पडोळे यांनी केली आहे.

# डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी आंदोलन




**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

आज राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने मंत्रालयाच्या समोर डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळालाच पाहिजे यासाठी तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे सरकारकडे एकच मागणी करण्यात आली डॉ. संपदा मुंडे यांच्या वर झालेल्या अन्यायाची सखोल चौकशी करण्यात यावी. राजकीय दबावाखाली सत्य दडपण्याचे प्रयत्न होत आहेत, पण आम्ही शांत बसणार नाही.

डॉ. संपदा मुंडे या भगिनीला न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष पूर्ण ताकदीने उभी आहे. सरकारने कितीही दडपशाही केली, धमक्या दिल्या, तरी सत्याचा आवाज आम्ही दाबू देणार नाही. न्यायासाठी लढणं हे गुन्हा नाही, आम्हाला न्यायासाठी लढणारच. यावेळी या आंदोलनात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश पदाधिकारी, जिल्हा-शहराध्यक्ष कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी आमचा लढा न्याय मिळेपर्यंत सुरू राहील हा इशारा सरकार ला देण्यात आला. आंदोलनात महेबूब शेख आक्रमक होते.

# "युवा लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार – २०२५" या बहुमानाने विक्रम साबळे यांचा गौरव

## युवा नेतृत्व विक्रम साबळे युवकांना प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व - काशिनाथ पारठे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वार्ताहर**

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात आयोजित भव्य समारंभात, खोपोलीचे तेजस्वी युवा उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते कु. विक्रम यशवंतशेठ साबळे यांना नेहरू युवा केंद्र, बीड (भारत सरकार संलग्न) आणि क्रांती ग्रामविकास संस्था संचालित यांच्या वतीने "युवा लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार – २०२५" या बहुमानाने गौरविण्यात आले.

हा सन्मान आयुष्यमान भारत मिशनचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.ओमप्रकाशजी शेट्ये आणि मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध सर्वपरिचित माहेरची साडी मधील अभिनेत्री सौ. अलका कुबल-आठल्ये यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.



खोपोलीच्या भूमीतून झळकणारे हे उद्योजक कु. विक्रम यशवंतशेठ साबळे हे केवळ व्यावसायिक यशाचे प्रतीक नसून सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि नवयुगाच्या सकारात्मक विचारांचे प्रेरणास्त्रोत आहेत. सामाजिक उपक्रम सातत्याने राबवून त्यांनी समाजसेवेचा आदर्श उभा केला आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेतल्याने खोपोली शहरातील त्यांच्या शुभ ,हित चिंतक समर्थकांनी त्यांना अभिनंदन करून शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

त्यांचा सामाजिक व राजकीय प्रवास पाहता त्यांच्या नेतृत्व गुणाला भाजप पक्षाकडून आगामी निवडणूकित नगराध्यक्षा पदाच्या उमेदवारीची संधी मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात असून पक्ष श्रेष्टी त्या निर्णयावर कधी शिक्कामोर्तब करतील याकडे खोपोलीकरां मध्ये समाज माध्यमातून जोरदार चर्चा हि होत असताना पाहायला मिळत आहे .

# "कर्तव्यनिष्ठ, संवेदनशील आणि लोकाभिमुख अधिकारी संदीप कहाळे — म्हसळेकरांचा भावपूर्ण निरोप, रवींद्र पारखे यांचे स्वागत

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा प्रतिनिधी शिरीष समेळ**

सरकारी सेवेतील अधिकारी येतात-जातात... परंतु काही व्यक्तींचा कार्यकाळ संपल्यानंतर देखील त्यांच्या कार्याची छाप जनतेच्या मनात कायम राहते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे सहायक पोलीस निरीक्षक संदीप कहाळे — ज्यांनी म्हसळा तालुक्यातील जनतेच्या मनात आपल्या प्रामाणिक, संवेदनशील आणि लोकाभिमुख कार्यपद्धतीने वेगळी ओळख निर्माण केली. गेल्या १४ महिन्यांपासून म्हसळा पोलीस ठाण्याचा कार्यभार सांभाळताना कहाळे यांनी केवळ कायदा-सुव्यवस्था राखली नाही, तर नागरिकांच्या मनात पोलीस प्रशासनाबद्दल विश्वास निर्माण



केला. "पोलीस" म्हणजे केवळ शिस्त नव्हे तर सहानुभूतीही असते, हे त्यांनी आपल्या वर्तनातून दाखवून दिलं.म्हसळा पोलीस ठाण्यात नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या निरोप समारंभात वातावरण भारावलेलं होतं. कारण हा केवळ अधिकाऱ्याच्या बदलीचा प्रसंग नव्हता, तर जनतेने आपल्या 'विश्वासू पोलीस निरीक्षकाला' दिलेला सन्मान होता. कार्यक्रमात विविध समाज घटक, व्यापारी, ग्रामस्थ आणि सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी हिंदू समाज अध्यक्ष समीर बनकर, मुस्लीम समाज उपाध्यक्ष सलीम उकये, सचिव महेश पवार, महादेव पाटील, मधुकर गायकर, सुनील शेडगे, सौरभ गोरेगावकर, तुकाराम पाटील, निलेश मेंदडकर, दिलीप कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी कहाळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या बदलीचा निरोप भावनिक शब्दांत व्यक्त केला. प्रत्येक वक्त्याच्या ओठांवर एकच गोष्ट होती — "कहाळे सर हे कठोर पण माणुसकी जपणारे अधिकारी आहेत." त्यांच्या कार्यकाळात म्हसळा तालुक्यातील गुन्हेगारीला आळा बसला, तसेच सामाजिक सलोख्याचं वातावरण निर्माण झालं. लहानसहान तक्रारी असोत किंवा गंभीर गुन्हे — कहाळे यांनी नेहमीच तटस्थ आणि न्याय्य निर्णय देण्याचा प्रयत्न केला.याच कार्यक्रमात नवीन पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांचे म्हसळेकरांच्या वतीने स्वागत करण्यात आले. पारखे हे देखील अनुभवी अधिकारी असून, म्हसळ्यातील नागरिकांच्या अपेक्षा त्यांनी पूर्ण करतील, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी संदीप कहाळे यांना भावपूर्ण निरोप देत त्यांच्या पुढील सेवाकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. म्हणतात ना — "मनापासून केलेले काम कधीच वाया जात नाही," त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे म्हसळा पोलीस ठाण्याचा हा निरोप समारंभ होता.

जनतेच्या चेहऱ्यावरचं समाधान आणि डोळ्यांतील ओल — या दोन्ही गोष्टी सांगत होत्या की, अधिकारी म्हणून नव्हे तर माणूस म्हणून संदीप कहाळे यांनी म्हसळेकरांच्या मनात आपली वेगळी जागा निर्माण केली आहे.

# सोशल मीडियावर "RSS मुर्दाबाद" स्टेटस ठेवणाऱ्या तरुणाला बेदम मारहाण – वंचित बहुजन आघाडीचा न्यायासाठी पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी – प्रकाश गवारे**

उमरी येथील ओंकार लांडगे या तरुणाने आपल्या सोशल मीडिया हँडलवर "RSS मुर्दाबाद" असे स्टेटस ठेवले होते. यावरून संतप्त झालेल्या आरएसएसच्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी त्याचे अपहरण करून दुसऱ्या गावात नेऊन त्याला अमानुष मारहाण केली. या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली असून, सार्वजनिक ठिकाणी लज्जास्पद प्रकार घडवून तरुणाचा अपमान केल्याची गंभीर तक्रार करण्यात आली आहे.या घटनेनंतर पीडित ओंकार लांडगे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी काल नांदेड येथे वंचित बहुजन आघाडीच्या प्रतिनिधींची भेट घेतली. यावेळी या प्रकरणी तातडीने न्याय मिळावा, आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.या घटनेची गंभीर दखल घेत वंचित बहुजन आघाडीच्या प्रतिनिधींनी नांदेडचे पोलिस अधीक्षक (SP) यांची भेट घेऊन आरोपींविरुद्ध Atrocities Act व इतर गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवण्याची मागणी केली. पोलिस अधीक्षकांनी तत्काळ संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले असल्याचे समजते.दरम्यान, वंचित बहुजन आघाडीने स्पष्ट केले आहे की — "ओंकार लांडगे याच्यावर



झालेला अन्याय आम्ही सहन करणार नाही. पीडित तरुणाच्या पाठीशी वंचित ठामपणे उभी आहे."मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणी सर्व आरोपींवर रात्री 3 वाजता Atrocities Act सह इतर गंभीर कलमान्वये गुन्हे नोंदविण्यात आले असून, पुढील तपास नांदेड पोलिसांकडून सुरू आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# जरंडी ग्रामपंचायतीचा वीज बचतीसाठी अभिनव उपक्रम!

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी**
**विजय काळे**




**सोयगाव:-** तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत वीज बचतीसाठी एक अनोखा आणि आदर्श उपक्रम हाती घेतला आहे.ग्राम संसद कार्यालयाच्या पुढाकाराने एकूण १७५ इलेक्ट्रिक खोलवर एलईडी लाईट्स बसविण्यात आल्या,ज्यामुळे गावात सर्वत्र उजेडाची लखलख वाढली आहे.या उपक्रमाचा उद्देश ऊर्जा बचत, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा आहे.ग्रामपंचायत अधिकारी एस.एम.मंगरूळ आणि सरपंच स्वाती दिलीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपसरपंच संजय गिरधर पाटील यांच्या सहकार्याने हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण झाला.

ग्रामपंचायतीच्या या पुढाकाराचे ग्रामस्थ आणि स्थानिक संघटनांकडून कौतुक होत आहे.

**प्रतिक्रिया :**

दिलीप पाटील (ग्रामस्थ) : "गावात आता प्रकाश व्यवस्था उत्तम झाली आहे. एलईडी लाईट्समुळे वीज बचतही होईल. ग्रामपंचायतीचा हा निर्णय कौतुकास्पद आहे."

धुरपताबाई सोनवने (महिला मंडळ अध्यक्षा) : "पूर्वी रात्री अंधारामुळे फिरणे अवघड होत होते. आता सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे."

अबु राठोड : "हा उपक्रम खरंच प्रेरणादायी आहे. वीज बचत आणि पर्यावरण संरक्षण दोन्ही साध्य झाले."

या अभिनव उपक्रमामुळे जरंडी गाव समृद्ध पंचायतराज अभियानातील एक आदर्श गाव म्हणून उदयास येत आहे.

# रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूल करंजा उरण शाळेत ओएनजीसी मार्फत शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/प्रतिनिधी**




ओएनजीसी भारतातील सर्वात मोठी सरकारी मालकीची तेल आणि नैसर्गिक वायू शोधणारी आणि उत्पादक कंपनी आहे आणि या ओएनजीसी कंपनीकडून नेहमी सामाजिक कार्य शिक्षण, महिला सक्षमीकरण आरोग्य इत्यादी सामाजाभीमुक कार्य केले जाते.

बुधवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूल करंजा मराठी व सेमी इंग्रजी माध्यम या विद्यालयात ओ एन जी.सी. प्लांट उरण यांच्या सीएसआर फंडातून विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, आय कार्ड, रेनकोट, स्कूल युनिफॉर्म, स्पोर्ट युनिफॉर्म ,शूज तसेच विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण जे आजकाल एक महत्त्वाचे क्षेत्र बनले आहे, ज्यामुळे समस्या सोडवणे आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करणे सोपे होते त्यामुळे संगणकाचा वापर शिक्षण आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाद्वारे कसा करायचा हे शिकल्यामुळे समस्या सोडवण्याची क्षमता वाढते. यासाठी १० संगणक सेट, इन्व्हर्टर, एसी इत्यादी साहित्य देण्यात आले. सदर कार्यक्रमास ओएनजीसी प्लांट तर्फे भावना आठवले मॅडम ,जी.एम. हेड एच. आर. इ.आर संजीव मोहन, सी.जी.एम .सपोर्ट मॅनेजर अभिषेक पाटील सर, साद फाउंडेशन तर्फे वामन कांबळे सर ,वंदना मॅडम ,किशोर गमरे सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते

सदरच्या कार्यक्रमात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुरेखा चंद्रशेखर म्हात्रे मॅडम यांनी प्रास्ताविक केले. आठवले मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सिताराम नाखवा जेष्ठ सदस्य यांनी विद्यालयाची माहिती सांगितली. तसेच ओएनजीसी चे सी.जी.एम. सपोर्ट मॅनेजर संजीव मोहन सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांसमोर मौलिक विचार मांडले .नंतर अभिजीत पाटील सरांनी मार्गदर्शन केले .आणि साद फाउंडेशनचे संस्थापक वामन कांबळे सर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना प्रकल्पाबद्दल माहिती सांगितली. विद्यार्थ्यांना, विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाल्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती उत्तमरीत्या होऊ शकते यासाठी विद्यालयातील कु. हेतल पांचाळ व तनिष्का पाटील यांनी आपल्या मनोगतातून ओएनजीसी प्लांट उरण चे सर्व अधिकारी, पदाधिकारी तसेच साद फाउंडेशनचे अधिकारी पदाधिकारी यांचे आभार व्यक्त केले.त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानून अध्यक्षांच्या वतीने कार्यक्रम संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

# शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सुरेश बनकर यांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सलग सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील विविध गावांतील शेतशिवारात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.सहकाऱ्यांसोबत लिहाखेडी-मांडणा शिवार येथे भाजपा प्रदेश चिटणीस तथा सिल्लोड सोयगाव विधानसभा नेते सुरेश भाऊ बनकर यांनी बांधवार जाऊन शेतकरी बांधवांची भेट घेऊन नुकसानीची पाहणी केली असून, संबंधित प्रशासनाशी समन्वय साधून चर्चा केली. तसेच येत्या २ ते ३ दिवसांत शेतकरी बांधवांना नुकसानभरपाई महायुती सरकारकडून देण्यात येणार आहे असे आश्वासन दिले.

शेतकऱ्यांच्या संकटाच्या काळात आम्ही सर्वजण सोबत आहोत असा विश्वास सुद्धा यावेळी त्यांनी दिला. याप्रसंगी भाजपा भवन मंडळ तालुकाध्यक्ष एकनाथ हिवाळे, चेअरमन रामेश्वर डापके, भाजपा भवन मंडळ सरचिटणीस दिपक कळात्रे, भाजपा भवन मंडळ तालुका उपाध्यक्ष हरीदास साखळे आदींसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

सप्टेंबर 2025 मध्ये झालेल्या अतिवृष्टी मध्ये शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याची आम्ही स्वतः पाहणी करून महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या मदतीने पंचनामे करून घ्यायला लावले.

त्या नुकसानीची मदत येत्या दोन ते तीन दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असून, या आठवड्यातही शेतमालाचे सिल्लोड व सोयगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना महसूल व कृषी विभागाला दिल्या आहेत. आम्ही पुन्हा नुकसान भरपाईची मागणी शासन दरबारी करणार आहोत.

# दिघोडे गावची सुवर्ण कन्या अवनी कोळीच्या शिरपेचात पुन्हा एकदा सुवर्ण पदक

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**




उरण तालुक्यातील दिघोडे गावची सुवर्ण कन्या अवनी अलंकार कोळी बंदुकीची मक्तेदारी पुरुषांची हा समज मागे टाकून अवनीचे वडील अलंकार कोळी तिचे कुटुंब व दिघोडे गावचे ग्रामस्थ,तीचे प्रशिक्षक, मार्गदर्शक, नेहमीच तीला नेमबाजी च्या क्षेत्रात तीला प्रोत्साहन देणारे , नेमबाजी हा सामान्य माणसाच्या खिशाला न परवडणारा खेळ पण अवनी ची जिद्द चिकाटी च्या जोरावर ती सातत्याने या खेळात आपले भरिव योगदान देत आहे.आणि या खेळात आपले वर्चस्व सिद्ध करित आहे. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी तीने पिस्तूल शुटिंग ची सुरुवात केली आणि तेव्हापासून तीने मागे वळून पाहिले नाही.

अवनी ने आतापर्यंत अनेक स्पर्धांमधून गोल्ड, सिल्वर ,ब्रांझ पदक पटकावले आहेत. आणि आता ४०सा वी महाराष्ट्र रायफल शॉर्टगन शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धा २०२५ समीर पाटील शूटिंग स्पोर्ट्स अकॅडमी पालघर येथे दिनांक २१ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आयोजित केलेल्या स्पर्धेत सिद्धांत रायफल शूटिंग क्लब रायगडची कु.अवनी अलंकार कोळी हिने रायगड जिल्ह्याचे नेतृत्व करत ज्युनिअर वूमन डबल ट्रॅप शॉटगन स्पर्धेत सुवर्णपदक व ट्रॅप शूटिंग मध्ये ज्युनिअर वूमन ट्रॅप शुटिंग मध्ये कांस्यपदक मिळवले आहे .तिची झुंजार खेळी आणि नेत्र दीपक यशाचे क्लबचे अध्यक्ष विजय खारकर ,रायगड भूषण राष्ट्रीय नेमबाज सेक्रेटरी किशन खारके, प्रीतम पाटील, महेश फुलोरे ,अजिंक्य चौधरी, समाधान घोपरकर प्रकाश दिसले, अविनाश भगत, सुरज थळे, राजू मुंबईकर,वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे चे प्राचार्य अमोल ठक्कर सर,अलंकार कोळी तिचे प्रशिक्षक रालस्टोन कोयलो,आय. एस. एस. एफ. सर्टिफाय बी कोच यांनी अभिनंदन करून तिला पुढील राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत चमकदार कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. तिच्या या दैदिप्यमान कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# प्रदिप नारायणकरने पुण्यात केले स्वत:चे विश्व निर्माण

## आ. सुरेश धस यांनी भेट देऊन केले कौतुक

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**




आष्टी/पाटोदा/शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी दिनांक २७/१०/२०२५ मंगळवारी रोजी विमान नगर पुणे येथे पाटोदा शहरातील सुपुत्र प्रदीप हनुमंत नारायणकर यांनी स्थापन केलेल्या 'पीएचएन टेक्नॉलॉजी प्रा.लि.'या कंपनीस भेट दिली. पाटोदा सारख्या ग्रामीण भागातील तरुणाने पुण्यासारख्या शहरात स्वतःची कंपनी उभारून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावणे ही अभिमानास्पद बाब असल्याचे गौरवोद्गार आमदार सुरेश धस यांनी या वेळी काढले. या भेटी दरम्यान आमदार सुरेश धस यांनी कंपनीकडून रोबोट तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक संगणकीय प्रणाली या क्षेत्रातील सुरू असलेल्या संशोधन आणि निर्मिती प्रक्रियेची सविस्तर माहिती घेतली. कंपनीचे कार्य पाहून त्यांनी समाधान व्यक्त करत सांगितले की,पाटोदा या भूमीतील सुपुत्र प्रदीप नारायणकर यांनी केवळ आपल्या मेहनतीने आणि कल्पकतेने हे यश संपादन केले आहे. पाटोद्याची माती ज्या ताकदीने झळकते ती आज तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रदीपच्या माध्यमातून देशभर पसरत आहे हे खरोखर अभिमानास्पद आहे. प्रदीप नारायणकर यांनी ग्रामीण पार्श्वभूमी असून ही तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वत:चा ठसा उमटवला आहे. त्यांनी स्थापन केलेल्या 'पीएचएन टेक्नॉलॉजी' PHN Technology Pvt. Ltd.Pune. कंपनीतून आज रोबोटिक्स बुद्धिमत्ता आणि संगणकीय प्रणाली या क्षेत्रातील विविध अत्याधुनिक प्रकल्पांवर काम सुरू आहे. त्यांनी केवळ पुण्यात कंपनी स्थापन करून थांबले नाहीत तर आपल्या मूळ गावाशीही घट्ट नाळ जोडलेली असुन पाटोद्याच्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ते सातत्याने भेट देऊन विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान विषयक मार्गदर्शन करतात त्यांना प्रेरणा देतात आणि रोजगाराच्या संधी निर्माण करतात. आमदार सुरेश धस यांनी त्यांच्या या कार्याची मन:पूर्वक प्रशंसा करत म्हटले, की प्रदीपसारखे युवक आपल्या मतदारसंघाचे खरे प्रतिनिधी आहेत. आपल्या कष्टातून आणि बुद्धिमत्तेतून त्यांनी पाटोद्याची मान उंचावली आहे. अशा तरुणांकडून देशाच्या प्रगतीला नव्या दिशा मिळतात. त्यांनी या वेळी प्रदीप नारायणकर आणि त्यांच्या 'पीएचएन टेक्नॉलॉजी प्रा.लि.या कंपनीच्या सर्व भावी उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

# पाणीटंचाई विरोधात महाविकास आघाडीचा सिडकोवर मोर्चा




**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**


नवीन पनवेल शहरात गेल्या काही महिन्यांपासून पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. याच्या विरोधात महाविकास आघाडीने नवीन पनवेल येथील सिडकोच्या कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला. यावेळी सर्व पक्षांचे पदाधिकारी या मोर्चामध्ये सहभागी झाले होते.

नवीन पनवेल शहरातील अनेक इमारतींमध्ये पाणी जात नाही, पाण्यावाचून नागरिकांचे हाल होत आहेत. ऐन दिवाळीत देखील पाणीटंचाई निर्माण झाली होती. मात्र नवीन इमारतींना पाणी कुठून मिळते तसेच टँकरने शहरात पाणीपुरवठा केला जातो, मात्र नळाला पाणी येत नाही याचा जाब सिडको अधिकाऱ्यांना विचारण्यात आला. यापूर्वी पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी अनेक बैठका झाल्या. मात्र त्याला यश आले नाही. त्यामुळे हा आक्रोश मोर्चा 30 ऑक्टोबर रोजी काढण्यात आला. यावेळी भाजपाच्या नगरसेवकांचे फोन गेल्यानंतर त्यांना टँकर मिळतो मात्र आम्हाला मिळत नाही असा आरोप यावेळी करण्यात आला.

माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत, माजी सभापती काशिनाथ पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे, मनसे प्रवक्ता योगेश चिले, बबन विश्वकर्मा, यतीन देशमुख, कामगार नेत्या श्रुती म्हात्रे, पराग मोहिते यांच्यासह अनेक महिला, पुरुष, जेष्ठ नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी काही ठिकाणच्या पाईपलाईन लवकरच बदलल्या जाणार असल्याचे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# नवीन पनवेलमध्ये दूषित पाणीपुरवठा, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



नविन पनवेल सेक्टर १७ पीएल 5 येथील १ ते २४ इमारतींमध्ये मागील काही दिवसांपासून दूषित पाण्याचा पुरवठा होत असून, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सिडको प्रशासनाला याबाबत कल्पना देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला जात आहे. दूषित पाणीपुरवठा थांबला नाही, तर सिडकोवर मोर्चा काढत जाब विचारला जाईल, असा इशारा येथील रहिवासीनी दिला आहे. नविन पनवेल या भागामध्ये सतत दूषित मातीमिश्रित पाणीपुरवठा होत आहे. आधीच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना त्यातही दूषित, गढूळ पाण्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. नवीन पनवेल परिसरात अनेक ठिकाणी लहान मुलं व वयोवृद्ध नागरिक आजारी पडत आहेत. लहान मुलांमध्ये कॉलरा, डायरिया याची साथ पाहायला मिळत आहे. दूषित पाणीपुरवठा त्वरित थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा येथील स्थानिक रहिवासींनी दिला आहे.

# पुरातन चौल नगरीत श्री दत्त पौर्णिमा ग्रुपचा भक्ती, निसर्ग आणि संस्कृतीचा संगम

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



चौल भोवाळे येथे इतिहास आणि अध्यात्म यांचा संगम असलेल्या चौल नगरीत, श्री दत्त पौर्णिमा ग्रुपतर्फे आयोजित वार्षिक महाप्रसाद सोहळा भक्तिभावाने पार पडला. भाऊबीजनंतरचा गुरुवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या या सोहळ्यात श्रद्धा, परंपरा आणि निसर्ग यांचे अद्वितीय सौंदर्य खुलून दिसले. उंच पायऱ्यांवर वसलेले हे पुरातन दत्तदेवस्थान भक्तांसाठी श्रद्धेचे शक्तिपीठ मानले जाते. येथे दर्शन घेतल्यावर भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात, असा खोल विश्वास स्थानिक आणि आगंतुक भक्तांच्या मनात आहे. पहाटेपासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठी गर्दी झाली होती. दत्तगुरूंच्या जयघोषात वातावरण पवित्र झाले होते.सभोवतालचा परिसर त्या दिवशी अधिकच रमणीय भासत होता. डोंगरावर पसरलेली हिरवळ, मंद वाऱ्याने डोलणारी झाडे आणि थोड्याच अंतरावर दिसणारा रेवदंडा खाडीचा किनारा या सर्व निसर्गसंपदेमुळे भक्तीची अनुभूती अधिक गाढ झाली.महाप्रसादात विविध पारंपरिक पदार्थांची चव सर्वांना रुचली. सर्व वयोगटातील भक्तांनी भक्तिभावाने प्रसादाचा आस्वाद घेतला. श्री दत्त पौर्णिमा ग्रुपच्या सदस्यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि आदरयुक्त पद्धतीने संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले.

चौलचा हा सोहळा केवळ धार्मिक नाही, तर समाजातील सद्भाव, एकता आणि संस्कृती जपणारा पर्व ठरला. गुरुदेव दत्तांच्या आशीर्वादाने येणाऱ्या काळात अशा भक्ति सोहळ्यांमधून समाजात श्रद्धा आणि प्रेमाचे बंध अधिक मजबूत होतील, अशी ग्रामस्थांची भावना होती.

# सायबर सुरक्षा बाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**




सायबर सुरक्षा सप्ताह अनुशंगाने खांदेश्वर पोलीस ठाणे मार्फत पोलीस ठाणे हद्दतील विविध शाळा, महाविद्यालय व धार्मिक सामाजिक कार्यक्रमात सायबर सुरक्षाबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात उपस्थितांना शाळेतील विदयार्थ्यांना सोशल मिडीया वापराबाबत तसेच ऑन लाईन गेमिंगबाबत होणा-या फसवणुकी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक ओपन करू नका, तसेच अनोळखी व्यक्तीस ओटीपी शेअर करू नका. डिजिटल अरेस्ट हा फसवणुकीचा प्रकार असल्याने घाबरून जाऊ नका, पोलीस ठाण्याशी संपर्क करा. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक खात्रीशीर करा. अनोळखी व्यक्तीस आपली माहिती शेअर करू नका, दुप्पट पैसे, डिस्काउंट, पटकन लोन, यासारख्या लोभाला बळी पडू नका. सायबर फसवणुकीचे तात्काळ मदती करता 1930 / 1945 डायल करा, पोलीस मदतीसाठी 112 डायल करा.

यावेळी नवी मुंबई पोलीस व्हाट्सएप चॅनेल तसेच फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर पेजची माहिती दिली. इत्यादी सुचना देण्यात आल्या.या कार्यक्रमादरम्यान विविध शाळा महाविद्यालय व नागरिकांनी उत्सपुर्त प्रतिसादर देवुन सायबर सुरक्षाबाबत जागृत राहुन इतरांनाही जागृत राहण्याबाबत आव्हान करणार असल्याबाबत आश्वासन देण्यात आले आहे.

तसेच पनवेल रेल्वे स्टेशन व 'डी' मार्ट नवीन पनवेल येथे पथनाट्यद्वारे व खांदा कॉलनी परिसरात रोटरी क्लब मार्फत सायकल रॅली काढुन सायबर सुरक्षा बाबत जनजागृती करण्यात आली.

# सिल्लोडमध्ये प्रभाग रचना व मतदार याद्यामध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याची शिवसेनेकडून तक्रार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** सिल्लोड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ मध्ये प्रभागरचना व मतदारयाद्यामध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याची तक्रार तालुका शिवसेनेच्या वतीने निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

राजकीय सूडबुद्धीने विशिष्ट मतदारांवर जाणीवपूर्वक आक्षेप दाखल करून त्यांना मतदानापासून डावलण्याचे काम स्थानिक निवडणूक अधिकारी व भारतीय जनता पार्टीचे लोक करीत आहे . प्रभाग रचना व मतदार याद्या या पारदर्शक व्हाव्यात .यात कुठलाही राजकीय हस्तक्षेप खपून घेणार नाही, हा प्रकार थांबवा नसता जनआंदोलन उभारण्याचा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे.



शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार श्रीमती विजयमाला पुपळवाड यांच्याकडे सदर तक्रार अर्ज सोपविला. याप्रसंगी कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, माजी नगरसेवक विठ्ठल सपकाळ, शेख सलीम हुसेन, सुधाकर पाटील,अकील वसईकर, प्रशांत क्षीरसागर, कुणाल सहारे, रवी गायकवाड, गौरव सहारे, आनंद अग्रवाल आदी पदाधिकारी उपस्थित होते.

दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे की, सिल्लोड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक सन २०२५ कार्यक्रम जाहीर झालेला असून अंतिम प्रभागरचना आणि प्रारूप मतदारयाद्या प्रसिद्ध करण्याचे काम स्थानिक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मार्फत चालू आहे. प्रारूप मतदारयादी व अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध झालेली आहे. परंतु राजकीय स्वार्थापोटी भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या मर्जीप्रमाणे व त्यांना राजकीय फायदा होण्याच्या उद्देशाने प्रारूप मतदारयाद्यामध्ये बदल करण्याचे कटकारस्थान रचल्या जात असल्याच्या तक्रारी यापूर्वी देखील करण्यात आलेल्या आहे. तरी प्रारूप मतदारयाद्या ह्या मा. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रगणक गट न तोडता बनविण्यात आल्या आहेत. फक्त आता राजकीय सूडबुद्धीने व स्वार्थपोटी या प्रगणक गटांमध्ये फेरफार करून व निवडणूक आयोगाची दिशाभूल करण्याचे व विशिष्ट मतदारांवर जाणीवपूर्वक काही एक संबंध नसतांना आक्षेप दाखल करून त्यांना मतदानापासून डावलण्याचा किंवा इतरत्र हलवण्याचे काम स्थानिक निवडणूक निर्णय अधिकारी व भारतीय जनता पार्टीचे लोक करीत आहे. त्यामुळे प्रभागरचना, मतदारयादी तयार करीत असताना मा. निवडणूक आयोगाने दिलेले सर्व नियमांचे व निर्देशांचे तंतोतंत पालन करणे संदर्भात संबंधितांना आदेशित करावे अन्यथा विशिष्ट पक्षाला फायदा देण्याच्या उद्देशाने स्थानिक निवडणूक अधिकार्याने काम केल्यास त्यांच्या विरोधात जनआंदोलन उभारण्यात येईल व यामुळे होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी निवडणूक आयोगाची राहील यांची नोंद घ्यावी असा इशारा या अर्जात देण्यात आला आहे. सदरील अर्जाच्या प्रति मुख्य निवडणूक आयुक्त,जिल्हाधिकारी यांना देखील देण्यात आल्या आहेत.

# उरणमध्ये गॅस माफियांचा पर्दाफाश !

## पोलिसांचे सर्जिकल स्ट्राईक ; लाखोंचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण तालुक्यात गॅस सिलेंडरच्या नावाखाली सुरू असलेला बेकायदेशीर धंदा अखेर पोलिसांच्या सापळ्यात अडकला! घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरमधून अवैधरित्या गॅस काढून त्याची काळाबाजारी करणाऱ्या रॅकेटवर उरण पोलिसांनी अशी धडक कारवाई केली की, स्थानिक गॅस माफियांच्या पायाखालची जमीनच सरकली.

द्रोणागिरी सेक्टर 50 परिसरात पुरवठा निरीक्षण विभाग आणि उरण पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. जीवनावश्यक वस्तू अधिनियम 1955 चे उघड उघड उल्लंघन करत हे रॅकेट व्यावसायिक (भारत गॅस) सिलेंडरमधील गॅस एका लोखंडी



पाईपच्या साहाय्याने काढून तो घरगुती सिलेंडरमध्ये भरत होते. नंतर हे सिलेंडर बेकायदेशीरपणे विक्री करून ते हजारोंची कमाई करत होते.

प्रभारी पुरवठा निरीक्षक प्रभाकर पद्माकर नवाळे यांच्या लेखी तक्रारीवरून उरण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलिसांनी कारवाई दरम्यान तब्बल 24 लाख 12 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.या कारवाईदरम्यान पोलिसांनी भारत गॅस कंपनीचे 277 व्यावसायिक सिलेंडर, एचपीचे 5 किलो वजनाचे 60 भरलेले व 8 रिकामे घरगुती सिलेंडर, एक टाटा टेम्पो (1112 मॉडेल), दोन बोलेरो जीप आणि अवैध गॅस भरण्यासाठी वापरण्यात येणारा लोखंडी पाईप असा मोठा माल जप्त केला.या सर्व धंद्याचा पर्दाफाश आमच्या प्रतिनिधींनी काही दिवसांपूर्वीच केला होता! त्यानंतरच कारवाईची चक्रे वेगाने फिरली आणि अखेर हे काळे कारनामे उघडकीस आले.

पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून त्यापैकी तीन जणांना घटनास्थळीच अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींमध्ये बालाजी धोंडीबा साळवी (वय 40), मनोहर गणेश गोंड (वय 36) आणि सुरेशकुमार सखाराम माजरा (वय 30) या तिघांचा समावेश आहे. या चौघांविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम, 1955 अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक स्मिता अशोक पवार या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या कारवाईनंतर उरण तालुक्यातील अवैध गॅस व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ माजली आहे. जनतेच्या डोक्यावर जिवाशी खेळणारा हा धंदा उघडकीस आणल्याबद्दल उरण पोलिसांच्या कारवाईचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# डॉ.संपदा मुंडे आत्महत्येस कारणीभूत असणाऱ्यांना कठोरत कठोर शासन देऊन फाशीची शिक्षा द्या

## किसान सभा व डॉक्टर असोसिएशनाची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** बीड जिल्ह्यातील शेतकरी कन्या असलेल्या डॉक्टर संपदा मुंडे या मुलीच्या आत्महत्येस कारणीभूत असणाऱ्यांना कठोरत कठोर शासन देऊन फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी भारतीय किसान सभा व पाटोदा तालुका डॉक्टर असोसिएशन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे पाटोदा तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन देऊन केली आहे. पाटोदा तहसीलदारामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दि.२९/१०/२०२५ बुधवार रोजी निवेदन देण्यात आले. या निवेदनातून मागणी करण्यात आली की बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मुलगी असलेली डॉक्टर संपदा



हिने आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करीत मोठ्या धैर्याने शिक्षण घेतलं होतं. डॉक्टर झाल्या नंतर सातारा जिल्ह्यात नोकरी लागली होती मात्र तेथील पोलीस अधिकाऱ्याने तिचा जाणीवपूर्वक छळ केला. वेळोवेळी झालेल्या छळाला वाचा फोडण्यासाठी तिने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार केली होती. मात्र वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने देखील लक्ष दिले नाही. वरिष्ठांकडे तक्रार केल्याचे माहिती झाल्यानंतर फलटणच्या पोलिसांनी तिला अधिकच त्रास देणे सुरू केले. या त्रासाला कंटाळून तिने अखेर आत्महत्या केली. तिच्या आत्महत्यास कारणीभूत ठरलेले पोलीस अधिकाऱ्यांना शासनाने तात्काळ कठोरात कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी भारतीय किसान सभा व डॉक्टर असोसिएशनच्या वतीने नायब तहसीलदार मोरे साहेब यांच्या मार्फत मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करण्यात आली. या वेळी भारतीय किसान सभा जेष्ठ नेते कॉ.महादेव नागरगोजे, नरहरी पवळ, नामदेव मळेकर, सुधाकर सिरसाठ, संगिता केदार, सुखदेव नागरगोजे, भरत नागरगोजे, डॉ.शेख अमीन, डॉ. रविंद्र राजपुरे, डॉ.राख, डॉ.सुसलादे, डॉ.कल्याण पोकळे, डॉ.तांबे, डॉ. रविंद्र गोरे, डॉ.प्रताप जाधव, डॉ.बडे, राजेंद्र खाडे, नरहरी पवळ, नामदेव मळेकर, सुधाकर सिरसाठ, संगिता केदार, सुखदेव नागरगोजे, भरत नागरगोजे सह आदी उपस्थित होते.

# स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश यांच्यातर्फे सो.भारती मधुकर गोफणे यांना आदर्श सरपंच राज्यस्तरी पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी:-अनिल ससाने**

सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य आयोजित मान कर्तव्याचा सन्मान नेतृत्वाचा राज्यस्तरीय सन्मान सोहळा 2025 विविध क्षेत्रात उल्लखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो जो व्यक्ती आत्मविश्वासाने आणि जिद्दीने ध्येय साध्य करीत राहतो त्याच्या कार्यक्षेत्रावर खंबीरपणे उत्तम कामगारी करून समाजाचे कल्याण करण्यासाठी सतत धडपड करत राहते आशा व्यक्तींच्या आम्हाला सार्थ अभिमान आहे संघर्षातून मिळाले यश मोठे आहे भातोड़ी गावाचा शैक्षणिक, सामाजिक, गाव विकास झाल्यामुळे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी सौ. भारती मधुकर गोफणे यांना दिनांक 30 ऑक्टोबर 2025 रोजी अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार प्रधान करण्यात आला सरपंच सेवा संघाचे समर्थक बाबासाहेब पावसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेब कलाभक्त श्रीमद डॉ. श्रीकांतदास धुमाळ महाराज उज्जैन, ग्रामसेवक नेते एकनाथराव ढाकणे साहेब यांच्यासह दिग्गज मान्यवरांच्या हस्ते व यादवराव पावसे पाटील रोहित पवार यांच्या



प्रमुख उपस्थितीत पुरस्कार माऊली सहकुळ सभागृह सावेडी रोड अहिल्यानगर येथे सन्मान सोहळा वरील मान्यवराच्या हस्तेआदर्श सरपंच राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला

सौ. भारती मधुकर गोफणे ,राहणार ,भातोडी, तालुका, जाफराबाद, जिल्हा, जालना, येथील रहिवाशी आहे त्यांना आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाल्यामुळे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे व जाफराबाद भोकरदन मतदारसंघाचे आमदार तथा पंचायत राज अध्यक्ष संतोष भाऊ दानवे, शालिकराव पाटील म्हस्के (जिल्हा परिषद सदस्य) संजूबाबा गायकवाड ,(लहू शस्त्र सेना संस्थापक अध्यक्ष) राजू चव्हाण, मधुकर गाडे, नाना भागिले, विजू परिहार, मनोज शिंदे, सुनील ससाने, राजू खोत, संतोष लोखंडे, अनिल ससाने, परमेश्वर गोफणे, समाधान उगले,राजेश गायकवाड अरुण भोरे, मधुकर गोफणे सर,भीमराव जाधव सर,शशिकांत जाधव सर,रमेश,रवींद्र, उगले, अंबादास उगले, अशोक भोरे, ज्ञानेश्वर पवार, नितीन गावंडे, समाधान उगले, अंकुश उगले,व जाफराबाद तालुक्यातील पंचकृषितील सरपंच उपसरपंच सामाजिक संघटना सामाजिक कार्यकर्ते आदी क्षेत्रातील लोकांनी भरभरून शुभेच्छा देऊन अभिनंदन केले

# बच्चू कडूचे महाएल्गार आंदोलन शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी रणजीत ठाकुर**

भारत हा कृषिप्रधान देश आहे.भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती आणि शेतीशी संबंधित उद्योग यांच्यावर आधारित आहे. संपूर्ण भारतात शेती व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय असून 75 टक्के पेक्षा अधिक जनता शेतीच्या व शेती संबंधित लघु उद्योगाच्या भरवशावर जीवन व्यतीत करीत आहे,परंतु सध्या देशातील शेतकऱ्यांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे.भारत देशात निसर्गतःच विविधता आहे या भौगोलिक विविधतेनुसार शेतीसुद्धा अनेक प्रकारे केली जाते. समुद्रकिनाऱ्यावरील राज्यांमध्ये भाताचे पीक अधिक प्रमाणात घेतल्या जाते तर उत्तर भारतात गहू, ज्वारी, बाजरी, आलू इत्यादी मोठ्या प्रमाणात पिकविले जातात विविध पिकांनी नटलेल्या शेती व्यवसायाला या देशात अत्याधिक महत्त्व आहे. सध्या भारत देशातील जम्मू-काश्मीर पासून तर कन्याकुमारी पर्यंत सर्व शेतकरी हवालदिल झाले आहेत.शेती व्यवसायाला निसर्गाचा आणि राज्यकर्त्यांचा सातत्याने फटका बसत आहे. वीज,पाणी, रस्ते इत्यादी अगदी मूलभूत सुविधा पुरविण्यात शासन पूर्णतः अपयशी ठरते आहे.

विद्यमान केंद्र व राज्य शासनाकडे शेतकरी व शेती या दोन्ही विषयी कोणतेही मजबूत धोरण नाही. केंद्र व राज्य सरकार शेतीपेक्षा कारखानदार व उद्योजक यांना झुकत माप देऊन त्यांचे विषयी फायद्याचे ध्येय धोरण राबवून अंमलबजावणी करण्यात मग्न आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये शेतकरी हा कधी आसमानी तर कधी सुलतानी संकटाचा बळी ठरला आहे. विदर्भ हा कपाशी व सोयाबीन या पिकांसाठी प्रसिद्ध आहे तसेच मराठवाडा येथे सोयाबीन पिकाला प्राधान्य दिले जाते. परंतु मागील दहा वर्षात टाचणी पासून शेतीविषयक अवजारे, बी बियाणे, तर खते मोठ्या वाहनापर्यंत सर्वच वस्तूंचे भाव प्रचंड वाढले आहेत. शेतीत पिकणारे पिकांचे भाव,सोयाबीनचे भाव मागील दहा वर्षापासून जैसे थे आहेत. अस्मानी संकटामुळे सोयाबीन पिकाचा एकरी उतारा प्रचंड घटला आहे आणि त्यातही सुलताने म्हणजे शासनाच्या वतीने सोयाबीनला दिला जाणारा भाव अतिशय कवडीमोल आहे. यामुळे शेतकरी प्रचंड आर्थिक टंचाईत सापडला आहे.प्रशासकीय अधिकारी व शासकीय यंत्रणा केवळ पिकांच्या नुकसानीचे निरीक्षण करून अतिशय तूटपुंजा मोबदला देत आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन गरजाही भागविणे कठीण झाले आहे.शेतकऱ्यांसाठी कनवळा करणारे सहानुभूती दाखविणारे आम्हीच तुमचे उद्धार करते या अविर्भावात वावरणारे अनेक नेते महाराष्ट्र राज्यात आहेत, तरीही शेतकऱ्याची एवढी दयनीय अवस्था झाली आहे. या डुप्लिकेट नेत्यांवर आता शेतकऱ्यांचा भरोसा राहाला नाही त्यामुळे बच्चुभाऊ कडू यांच्या मोर्चाला संपूर्ण राज्यातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. नागपुर येथे बच्चू कडू यांच्या नेतृत्वात आंदोलन करून अनेक वर्षानंतर शेतकरी स्वयंस्फूर्तीने एकवटल्याचे बघावयास मिळत आहे या आंदोलनामुळे शेतकऱ्यांना आशेचा किरण दिसत आहे.

बच्चुभाऊ कडू यांना सत्ताधारी सोडून इतर सर्व पक्षांच्या नेत्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. नागपुर कडे येणारे सर्वच राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्ग शेतकऱ्याने जवळपास बंद केल्याची अवस्था आहे नागपूर खंडपीठाने बच्चू कडू यांना 29 ऑक्टोबर च्या दुपारी सहा वाजेपर्यंत आंदोलन करीत असलेली जागा खाली करण्याचे आदेश दिले होते. परंतु न्यायालयाच्या आदेशाचा आदर करीत आंदोलनाचे गांभीर्य लक्षात ठेवून बच्चू कडू व त्यांच्या सहकार्यांने हे आंदोलन सत्तेतील काही प्रतिनिधी त्यांना भेटल्याशिवाय ठोस उपाययोजना केल्याशिवाय हे आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार व्यक्त केला होता. त्याला राज्यातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.शेतकऱ्याएवढी बिकट अवस्था सध्या महाराष्ट्र राज्यात कोणत्याच वर्गाची नाही शेतकऱ्याला आर्थिक दृष्ट्या भरभरून मदत केली नाही तर नकळत शेतकऱ्याला आत्महत्या केल्याशिवाय पर्यायच शिल्लक राहणार नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या मागण्यांना शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांकडून देण्यात आला आहे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करावी हा मुद्दा अधिक प्रकरणे आंदोलन करता कडून मांडल्या जात आहे. शासनाने

शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या ज्या धोरणत्मक भूमिका आहेत त्या प्रत्यक्षात आणण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांचा रोष सत्ताधाऱ्यांना येणाऱ्या काळात अडचणीत आणू शकतो.शेतकऱ्यांना बच्चू कडूनी फक्त मार्ग दाखविला आहे. शेतकऱ्यांच्या मनात मागील आठ ते दहा वर्षांपासून सत्ताधाऱ्यांच्या विरोधात असंतोष खदखदत आहे त्याचं रौद्र रूप झाले तर हा संताप थांबविणे शासनाला शक्य नाही. शासनाने अधिक वेळ न घालवता बच्चू कडू यांचा सन्मान करून त्यांनी केलेल्या मागण्या तूर्तास मान्य कराव्यात हेच राज्याच्या हिताचे ठरेलं.

**रवि अंभोरे मुख्य संपादक,**
**स्वर्णिम उदय**



# 'कॉपीमुक्त' परीक्षेची तयारी आत्तापासूनच करा- सी.पी. पालवे

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते सी.पी. पालवे यांनी बीड जिल्ह्यातील शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा आणि आगामी दहावी-बारावीच्या परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी जिल्हा व तालुका शिक्षण विभाग, तसेच सर्व शिक्षक आणि पालकांना एक महत्त्वपूर्ण व विनम्र आवाहन केले आहे. आतापासूनच विद्यार्थ्यांच्या तयारीवर लक्ष केंद्रित करणे आणि परीक्षा 'कॉपीमुक्त' करण्यासाठी ठोस पाऊले उचलण्याची मागणी केली आहे.

इयत्ता बारावी आणि दहावीच्या बोर्ड परीक्षांना अजूनही चार ते पाच



महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. या वेळेचा सदुपयोग करून घेण्याचे आवाहन पालवे यांनी केले आहे. "आजच आपण विद्यार्थ्यांची परिपूर्ण तयारी करून घ्यावी. आपल्याकडे पुरेसा वेळ आहे," असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये, यासाठी शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण अध्यापनावर भर द्यावा आणि पालकांनी घरात सकारात्मक अभ्यासाचे वातावरण निर्माण करावे, अशी त्यांची भूमिका आहे.परीक्षेतील गैरप्रकार आणि कॉपीचे प्रकार पूर्णपणे थांबवण्यासाठी पालवे यांनी अत्यंत महत्त्वाची मागणी केली आहे. बीड जिल्ह्यातील संपूर्ण परीक्षा ही सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीतच घेण्यात यावी, असे त्यांचे ठाम मत आहे. यामुळे परीक्षा प्रक्रियेत पूर्णपणे पारदर्शकता येईल आणि प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही

**बीड जिल्हा 'कॉपीमुक्त जिल्हा' करण्याची मागणी**

बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रतिष्ठेसाठी त्यांनी सर्वात मोठा आणि महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. पालवे म्हणाले, "बीड जिल्हा हा तातडीने कॉपीमुक्त जिल्हा करावा." यासाठी जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग आणि पालक-शिक्षकांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. कॉपीमुळे गुणवत्तेचा दर्जा घसरतो आणि जिल्ह्याची बदनामी होते. त्यामुळे कठोर उपाययोजना करून गैरप्रकार करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई व्हावी, असे आवाहनही त्यांनी केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणासाठी स्वतंत्र इमारत उपलब्ध करून देण्याची आमदारांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

सिडको-नैना या नियोजन प्राधिकरणामार्फत होत असलेल्या विकास कामांमध्ये पनवेल तालुक्यातील ग्रामीण हद्दीतील श्वानांच्या निर्बिजीकरण आणि लसीकरण कार्यक्रमासाठी स्वतंत्र इमारत उपलब्ध करून देण्याची मागणी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पनवेल परिसरात भटक्या श्वानांच्या चाव्यामुळे अनेक जण जखमी झाल्याच्या घटना ताज्या आहेत. काही दिवसांपूर्वी चिखले येथे दहा ते बारा जणांचे श्वानांने लचके तोडले होते. तालुक्यात ७१ ग्रामपंचायतीपैकी दहापेक्षा जास्त ग्रामपंचायती सिडको क्षेत्रात आहेत तर 40 पेक्षा जास्त ग्रामपंचायती नैना अधिसूचित क्षेत्रात आहेत. सिडको आणि नैना क्षेत्रात मोठ्या संख्येने लोकसंख्या वाढली आहे. वाढत्या नागरीकरणाच्या दृष्टीने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाढत्या नागरिकरणामुळे होणारा कचरा, मटन, चिकन, मासे, दुकाने, छोटे-मोठे हॉटेल्समधील वाया गेलेले अन्य खाण्यासाठी श्वानांची संख्या वाढत आहे. वाढत्या श्वान संख्येमुळे मनुष्य आणि श्वान संघर्ष होत आहे. त्यामुळे श्वानदंशाचे प्रमाण वाढले आहे. नागरिकांमध्ये रेबीज सारख्या जीवघेण्या आजाराबद्दल भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विचुंबेजवळ भटक्या श्वानांसाठी निर्बीजीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. मात्र या ठिकाणी पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण आणि लसीकरण करण्यात येते, ग्रामपंचायत हद्दीतील भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण व लसीकरण सेवा ते देत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील श्वानांच्या वाढत्या संख्येस नियंत्रित करण्यासाठी आणि रेबीज सारख्या आजारापासून नागरिकांचे संरक्षण होण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण व लसीकरण कार्यक्रमासाठी सिडको-नैना प्राधिकरणाने स्वतंत्र इमारत उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

# रायगडची आरोग्य व्यवस्था हादरली

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे निलंबित; आरोग्य खात्यात खळबळ

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रायगड जिल्हा प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांना अखेर शासनाने निलंबित केले आहे. त्यांच्या कामकाजातील कथित अनियमिततेबाबत आलेल्या तक्रारीनंतर प्राथमिक चौकशीत काही निरीक्षणे नोंद झाल्याचे सांगितले जात असले तरी, या चौकशी प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप स्वतः डॉ. विखे यांनी केला आहे. महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी प्रे. ज्ञा. सोनटक्के यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत तत्काळ निलंबनाचा आदेश पारित केला. आदेशानुसार पुढील सूचना मिळेपर्यंत डॉ. विखे निलंबित राहणार असून, त्यांचे मुख्यालय आता ठाण्यातील उपसंचालक कार्यालयात निश्चित करण्यात आले आहे. त्या मुख्यालय सोडू शकणार नाहीत आणि या काळात त्यांना इतर कोणताही व्याप, उद्योगधंदा किंवा नोकरी करणे मनाई आहे. आदेशात त्यांना निलंबन कालावधीतील निर्वाहभत्ता देण्याची तरतूद केली आहे.




"एका निनावी पत्रावरून कारवाई; मला ऐकलेही नाही"या आदेशावर तीव्र नाराजी व्यक्त करत डॉ. मनीषा विखे म्हणाल्या,"माझ्यावर झालेली चौकशी एका निनावी पत्रावरून करण्यात आली. मला चौकशी अहवालही दाखवला नाही आणि माझ्या बाजूने मांडणी करण्याची संधीही नाकारण्यात आली. ही कारवाई नियमबाह्य आणि अन्यायकारक आहे. मी कोणताही गैरप्रकार केलेला नाही. या प्रकरणात आरोग्यमंत्र्यांकडे दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे." अधिकाऱ्यांमध्ये खळबळ, ठेकेदारांमध्ये आनंद? याकारवाई नंतर आरोग्य विभागात चर्चा रंगली आहे. काही अधिकारी गप्प बसले असले तरी त्यांच्या चेहऱ्यावरील चिंता स्पष्ट दिसत आहे. जिल्ह्यातील आरोग्य प्रकल्प, औषधखरेदी, आणि ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांच्या कामकाजावर अनेकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. अशा वेळी सत्य बोलणाऱ्या किंवा काटेकोर अधिकारीच निलंबित होतात का, असा सवाल कर्मचाऱ्यांमध्ये होत आहे.तर दुसरीकडे, काही स्थानिक सांगतात की डॉ. विखे यांनी रुग्णालयातील भ्रष्ट व्यवहारांवर कात्री मारण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे काही गट अस्वस्थ झाले आणि तक्रारींचा पाऊस पडू लागला. अखेर शासनाने घाईघाईत कृती केली, असा आरोपही पातळीबाहेर ऐकायला मिळतो आहे.डॉ. विखे यांच्या निलंबनामुळे आरोग्य यंत्रणेच्या व्यवस्थापनावर पुन्हा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. पारदर्शकतेचा अभाव, राजकीय दबाव, आणि अंतर्गत गटबाजी यांच्या सावटाखाली आता "रायगडची आरोग्य सेवा" पुन्हा विवेचनात येणार आहे, हे मात्र स्पष्ट झाले आहे

# स्ट्रोकने पिडीत रुग्णांना मिळणार 'गोल्डन अवर' मध्ये उपचार, खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये स्ट्रोक युनिटला शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

बदललेली जीवनशैली व खाण्या पिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे अलीकडच्या काळात ब्रेन स्ट्रोकच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. स्ट्रोक म्हणजे पक्षाघात याला ब्रेन अटॅक असंही म्हटलं जातं. जेव्हा मेंदूमध्ये एखादी नस ब्लॉक होते, तेव्हा ब्रेन स्ट्रोक येतो. ही एक जीवघेणी स्थिती आहे; ज्यावर वेळीच उपचार केला नाही, तर मृत्यूही होऊ शकतो योग्य वेळी उपचार केल्यास रक्तवाहिनीमधील अडथळा दूर केल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो. परंतु त्यासाठी मेंदूच्या पेशी मृत होण्याआधीच जलद उपचार मिळणे अत्यंत गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने स्ट्रोक युनिटला सुरूवात केली




आहे. यावेळी नवी मुंबईचे सहपोलीस आयुक्त संजय येनपुरे उपस्थित होते.

या युनिटमध्ये सीटी-एमआरआय चाचणी, थ्रोम्बोलिसिस, थ्रोम्बेक्टॉमी सारखी प्रगत तंत्रज्ञान, न्यूरो-आयसीयू आणि अनुभवी डॉक्टर, परिचारिकांची टीम यांचा समावेश आहे. नवी मुंबई, मुंबई, पनवेल आणि आसपासच्या शहरात राहणाऱ्या रुग्णांना या सुविधेचा नक्कीच फायदा होईल. मेंदूच्या एखाद्या भागात रक्त प्रवाहत अडथळा आल्यावर इस्केमिक स्ट्रोकतर मेंदूतील रक्तवाहिनी फुटली की हेमोरेजिक स्ट्रोक येतो. उच्च रक्तदाब, मधुमेह, कोलेस्ट्रॉल, धूम्रपान, लठ्ठपणा, हृदयरोग आणि बैठी जीवनशैली ही स्ट्रोकची प्रमुख कारणं आहेत.

नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमधील न्यूरोलॉजिस्ट आणि न्यूरोसायन्ससचे संचालक डॉ. पवन ओझा सांगतात की, स्ट्रोकच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये अचानक अशक्तपणा किंवा सुन्नपणा (बहुतेकदा शरीराच्या एका बाजूला), बोलण्यात किंवा समजण्यात अडचणी, दृष्टी समस्या, चक्कर येणे किंवा अचानक तीव्र डोकेदुखी यांचा समावेश होतो. सांकेतिक भाषेत स्ट्रोकच्या लक्षणांचे वर्गीकरण हे बीफास्ट असेही करता येते. याचा अर्थ (बॅलेन्स - संतुलन कमी होणे, आईज- दृष्टी धूसर होणे किंवा कमी होणे, फेस- चेहऱ्याचा काही भाग क्षीण होणे, आर्म- हात कमकुवत होणे, स्पीच- बोलण्यात अडचणी आणि टाईम- वेळ).

डॉ. ओझा पुढे सांगतात की भारतात स्ट्रोक हे मृत्यू आणि अपंगत्वाचे एक प्रमुख कारण ठरत आहे. बऱ्याचदा पक्षाघाताच्या सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केले जाते किंवा त्यांना अशक्तपणा किंवा थकवा समजून त्यावर वेळीच उरचार केले जात नाही. यामुळे मृत्यू ओढवू शकतो किंवा अर्धांगवायू, बोलण्यात अडचणी येणे किंवा दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून रहावे लागू शकते. या युनिटच्या माध्यमातून केवळ उपचार न पुरविता समाजामध्ये याबाबत जागरूकता वाढवणे, वेळीच उपचार सुरू करणे आणि रुग्णांना जीवनाची नवी संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे. वेळीच उपचार केल्याने केवळ एखादयाचा जीव वाचत नाहीत तर त्याच्या जीवनाची गुणवत्ता देखील सुधारता येते.

## वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याचा ग्राहकांना फटका

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात होत असलेल्या वारंवार खंडित वीज पुरवठ्याचा फटका येथील वीज ग्राहकांना बसत आहे. सब स्टेशनचे काम पूर्ण न झाल्याने अनेकदा वीज खंडित होते.

तालुक्यातील नेरे या ठिकाणी सब स्टेशनचे काम सुरू आहे मात्र अद्यापही या सबस्टेशनचे काम पूर्ण झालेले नाही. पनवेल तालुक्यातील नेरे येथे महावितरणच्या सब स्टेशनचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. हे काम अद्याप अपूर्ण अवस्थेत आहे. मात्र वीज गेल्यानंतर कित्येक तास विजेचा पत्ता नसतो. फॉल्ट शोधण्यातच बराचसा वेळ निघून जातो. पावसाळ्यात तर अनेकदा वीज पुरवठा खंडित होतो. ऑक्टोबर महिन्यात तर दिवसाआड वीज पुरवठा खंडित होत आहे. याचा फटका येथील हजारो वीज ग्राहकांना बसतो. काही वेळेला रात्रभर देखील वीज नसते. दोन दिवसांपूर्वी जवळपास सहा ते आठ तास वीज गायब होती. कनिष्ठ अभियंता कोकिटकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता अनेकदा त्यांचा भ्रमणध्वनी नॉटरीचेबल लागतो. त्यामुळे नागरिकांना वीज कधी येईल आणि विद्युत पुरवठा कुठे आणि कशामुळे खंडित झाला आहे हे समजत नाही.

त्यामुळे रात्रभर विद्युत पुरवठा कधी सुरळीत होईल याची वाट पाहण्याशिवाय वीज ग्राहकांकडे पर्याय नसतो. याबाबत कार्यकारी अभियंता जे जे माने यांच्याशी संपर्क साधला असता लवकरच नेरे येथून स्विचिंग चालू करणार असून काही दिवसातच सब स्टेशनचे काम पूर्ण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# वाशिम ची 'आयरन लेडी' ठरली जगाची गोल्डन गर्ल!, संगीता ढोले यांनी टाऊन मध्ये फडकविला तिरंगा

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम:** केप टाऊन,साऊथ आफ्रिका येथे नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड चॅम्पियन २०२५ क्लासिकल व इक्युप पावर लिफ्टिंग स्पर्धेत वाशिम 'आयरन लेडी' संगीता मारुती ढोले यांनी आपल्या शक्ती आणि जिद्दीच्या जोरावर जगाला थक्क करत गोल्ड आणि ब्राँझ मेडल पटकावले. भारताचा तिरंगा उंचावत त्यांनी वाशिम जिल्ह्याचे आणि महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव सुवर्णक्षणांनी जगाच्या क्रीडांगणावर कोरले.

दक्षिण आफ्रिकेतील केप टाउन येथे १०ते १९ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान पार पडलेला चॅम्पियनशिप क्लासिकल पावर लिफ्टिंग आणि इक्युप पावर लिफ्टिंग स्पर्धेत तब्बल ४२




देशांच्या खेळाडूंबरोबर खांद्याला खांदा लावत त्यांनी आपली ताकद सिद्ध केली. संगीता ढोले यांनी क्लासिकल पॉवरलिफ्टिंग च्या ४७ किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत ब्राँझ मेडल पटकावले.

त्यानंतर १९ ऑक्टोंबर रोजी झालेल्या ई क्यूप पावर लिफ्टिंग स्पर्धेत त्यांनी पुन्हा एकदा सुवर्णक्षण गोल्ड मेडल मिळवले.

> केपटाऊन च्या स्टेजवर उभा राहून जेव्हा इंडिया असं नाव पुकारलं गेलं, तेव्हा अंगावर रोमांच उभा राहिला. वजन उचलताना मला माझ्या देशाचा झेंडा आठवत होता. वाशिम पोलिसांचा गणवेश घालून देशाचे प्रतिनिधित्व करून जगासमोर उभा राहणार हा आयुष्यातील सर्वात अभिमानाचा क्षण आहे. माझ्या कुटुंबीयांनी, वरिष्ठांनी आणि प्रशिक्षकांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास मी पदकांमधून परत दिला आहे. आता माझी ध्येय पुढील विश्व स्पर्धेकडे आहे? ता ढोले, वर्ल्ड चॅम्पियनशिप विजेती

या दुहेरी यशाने केवळ वाशिम जिल्ह्याचाच नव्हे तर भारताचा ही मान उंचावला आहे.

या कामगिरीसाठी ढोले यांना पोलीस अधीक्षक अनुज तारे, अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, ग्रह पोलीस उप अधीक्षक वर्मा, तसेच राखीव पोलीस निरीक्षक शर्मा, प्रशिक्षक जयस्वाल, यांचे विशेष प्रोत्साहन लाभले. वडील मारुती ढोले, आई रेणुका, भाऊ भाग्यवान आणि विशेषतः यवतमाळचे जिम प्रशिक्षक मोहम्मद दानिश यांनी त्यांना जागतिक स्तरावर झेप घेण्यासाठी कठोर प्रशिक्षण दिले.

संगीता ढोले यांनी दाखवून दिले की शिस्त, संयम आणि परिश्रमाची ताकद असेल, तर कोणताही व्यासपीठ लहान नाही. वाशिम जिल्ह्याचा या पोलीस महिला खेळाडूंनी आज ताकद म्हणजे स्त्रीशक्ती हे जागतिक स्तरावर दाखवून दिले आहे.

# महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मालेगाव आगारातील वाहकाचा प्रवाशांच्या खिशावर डल्ला आर्थिक बोजाची वाढ

**दैनिक युवक आधार**
**बागलाण तालुका प्रतिनिधी-दीपक गायकवाड**

**बागलाण :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मालेगाव आगारातील वाहकाचा प्रकार प्रवाशांच्या खिशावर डल्ला मारून आर्थिक बोजा वाढत आहे. एकीकडे निसर्गाची अनियमित्ता कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ या सर्व गोष्टींना शेतकरी त्रस्त होऊन सामोरे जात असताना मालेगाव आगारातील वाहकाने प्रवाशांवर आर्थिक खर्च वाढवण्याचे नवीन शक्कल लढवली आहे. बुधवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी मालेगाव आगारातील बस क्रमांक महा-०६ एस-८४२३ या बसणे प्रवाशी प्रवास करीत होते. मालेगाव गोळवाड



या बस वाहकाने ताहाराबाद मुल्हेर गोळवाड फेरी प्रवास करत असताना MLG११५ ०६२५६२ डी.यस.भोसले यांनी मुल्हेर आल्यावर प्रवाशांचे उरलेले पैसे परत दिले नाहीत गर्दीचा फायदा व्हावा म्हणून वाहक,चालक हे मुजोरिने प्रवाशांचे राहिलेले पैसे न देता संगणमत करून आपला खिसा भरण्याचे काम करीत आहेत. वाहक,चालक यांनी वाहन मुल्हेर बस थांब्याच्या पुढे नेले आणि थोड्या अंतरावर पैसे राहिलेल्या प्रवाशांपैकी पत्रकाराने त्याचे ओळख पत्र दाखवल्याने त्यांचे राहिलेले पैसे परत देण्यात आले.असे पद्धतीने वाहक प्रवाशांच्या पैशावर डल्ला मारत असल्याचे दिसून आले अशा मुजोर वाहकांनी हा प्रकार थांबवावा अन्यथा माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीने अशा प्रकारांच्या विरोधात आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे मत व्यक्त केले.स्वतःचा फायदा करण्यासाठी वृद्ध, दिव्यांग,अपंग आणि अशिक्षित लोकांचेही असेच आर्थिक शोषण होत असेल असे परखड मत दिपक गायकवाड यांनी वेक्त केले आहे.

अशा वाहकास योग्य ती शिस्त देण्यात यावी व प्रवाशांच्या आर्थिक शोषणाचा प्रयत्न थांबवावा असा प्रश्न जनतेच्या मनात उद्भवत आहे.

# श्री छत्रपती शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित सचिव दत्ताराम रामदासी यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील भवानीनगर मधील नावाजलेली श्री छत्रपती शिक्षण संस्था असून त्यामध्ये नवनिर्वाचित सचिव म्हणून एम एस वाघीरे कॉलेज सासवड येथील निवृत्त प्राचार्य मा.दत्ताराम राजाराम रामदासी यांची सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे

सचिव म्हणून नियुक्ती झाल्यानंतर श्री छत्रपती शिक्षण संस्थेच्या सर्व शाखेतील मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक पर्यवेक्षक लिपिक शिपाई यांची ओळख होण्यासाठी गुरुवार दिनांक 30/10/2025 रोजी सकाळी ठीक 11.30 वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते

यावेळी सचिवांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले संस्थेचे सचिव रामदासी यांचा यावेळी सर्व शाखेतील मुख्याध्यापक शिक्षक व इतर कर्मचारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी मुख्याध्यापक रमेश मचाले सर यांनी मा.दत्ताराम रामदासी यांचा परिचय करून देण्यात आला.

सचिव रामदासी यांनी सलग 33 वर्ष सेवा करून शिक्षक उपशिक्षक पर्यवेक्षक उपमुख्याध्यापक प्राचार्य पदावर निवृत्त झाले असून त्यांनी आपल्या सेवेत असताना अनेक सामाजिक



शैक्षणिक विध्यार्थी मार्गदर्शन शाळा व्यवस्थापन अशी मजबूत कामे केली असल्याची माहिती देण्यात आली त्यांना सेवेत असताना जिल्हस्तरीय तालुकास्तरीय आदर्श शिक्षक आदर्श प्राचार्य असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले असल्याची माहिती सांगण्यात आली.

या बैठकीत सर्व संस्थेच्या कर्मचारी यांनी आपआपली परिचय सांगून अडचणी सांगण्यात आल्या ही बैठक श्री छत्रपती शिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

या सत्कारावेळी सचिव दत्ताराम रामदासी यांनी आपल्या भाषणात त्यांच्या सेवेत केलेल्या कार्याचा अनुभव व आपल्याला या संस्थेसाठी येथून पुढे काय काय उपक्रम करायचे आहेत याचे मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

## सारस्वत रत्न' पुरस्कार पनवेलमधील उद्योजक मंगेश परूळेकर यांना प्रदान




**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

सारस्वत चेंबर्सचा २०२४ चा 'सारस्वत रत्न' पुरस्कार पनवेलमधील उद्योजक मंगेश परूळेकर यांना नुकताच देण्यात आला.

गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत व डेंम्पो यांच्या हस्ते हा पुरस्कार परुळेकर यांना प्रदान करण्यात आला.

सिन्नपुरूष येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला. पनवेलमधील ओरायन मॉल आणि एमपी बिल्डर्सचे मालक मंगेश परुळेकर हे सामाजिक क्षेत्रातील कामात नेहमी अग्रेसर असतात. या पुरस्काराबद्दल परूळेकर यांचे अभिनंदन केले जात आहे.

# माणुसकी लाचार, चिमुकलीवर अत्याचार!

## परिसरात संतापाची लाट शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत घटना

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम गजानन पवार पाटील**

शिरपूर पोलीस स्टेशन एका गावात दहा वर्षीय चिमुरडीवर अत्याचार झाल्याची संतापजनक आणि धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र दोष निर्माण झाला आहे.

मिळालेला माहितीनुसार, पीडित मुलगी आणि आरोपी हे एकाच गावातील रहिवासी आहेत. आरोपीने २६ ऑक्टोंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता च्या सुमारास चिमुरडीला 'बदाम देतो'असे सांगून बोलावले. मुलिने नकार दील्यानंतर, आरोपीने जबरदस्तीने तिचा हात धरून आपल्या घरात नेले आणि

तिच्यावर अमाणूस कृत्य केले, असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.या घटनेनंतर पीडीतेच्या आईने तात्काळ



शिरपूर जैन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीवरून आरोपीविरुद्ध संबंधित गुन्हेगारी कलमांखाली गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

या घटनेमुळे परिसरात संतापाची वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, ही सर्वसामान्यांची मागणी आहे. समाजाला हादरवून टाकणारी ही घटना पुन्हा एकदा बालकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न उपस्थित करते आहे. पोलिसांकडून तपास सुरू असून न्याय मिळावा, अशी सर्वांच्या मनात अपेक्षा व्यक्त होत आहे.

## युती, आघाडीच्या राजकारणात निष्ठावंत कार्यकर्त्यांची अडचण; योग्यता असूनही होतेय गच्छंती

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (रणजितसिह. ठाकूर**



नगरपालिकेसह जिल्हा परिषद निवडणुकीची चाहूल सर्वत्र लागली आहे.निवडणुक कार्यक्रम वेळापत्रकाची अधिकृत घोषणा अद्याप व्हायची असली तरी कोणत्याही क्षणी निवडणूक कार्यक्रम लागू शकतो त्यामुळे इच्छुक कार्यकर्ते,पदाधिकारी व नेते पूर्णतः तयारीला लागले आहेत. आपापल्या पक्षाच्या वतीने कोणता उमेदवार निवडून येण्याच्या स्पर्धेत टिकेल याची चाचपणी सुरू झाली आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्हीकडे पक्षाने आपापल्या कार्यकर्त्यांना निवडणुकीत लढण्यापासून तर जिंकण्यापर्यंत तयार राहण्याचे संकेत दिले आहेत.महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस(श.प) व शिवसेना(ऊ बा ठा) तसेच महायुतीत भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस(अ.प) शिवसेना शिंदे यांचा समावेश आहे. आघाडी व युतीकडून कोणत्याही जागेची वाटाघाटी व तडजोड झाली नसल्यामुळे कोणती जागा कोणाकडे सुटेल यावर आणखी तरी निश्चिती नाही म्हणून युती आघाडीतील घटक पक्षातील सर्वच नेत्यांनी कार्यकर्त्यांना सजग राहण्याचे सांगितले. परंतु भविष्यात युती आणि आघाडी कायम राहली तर ज्या पक्षाकडे जागा सुटेल त्यांना फायदा होईल तर तयारी करूनही उमेदवारी न मिळालेल्या कार्यकर्त्यांची मात्र गच्छंती होणार आहे. त्यामुळे युती-आघाडीच्या राजकारणाचा कोणाला बळी द्यावा लागेल हे वेळेवरच ठरेल परंतु योग्यता असणाऱ्या व जनसामान्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना ही निवडणूक आपणच लढवावी ही महत्त्वाकांक्षा पक्षश्रेष्ठीसाठी नेत्यांसाठी अडचणीची ठरू शकते, यावर उपाय म्हणून एक तर मैत्रीपूर्ण लढत किंवा पक्षाशी बंड हे पर्याय मोठ्या प्रमाणात समोर येण्याची चिन्ह आहेत. रिसोड तालुक्यातील नऊ जिल्हा परिषद सर्कल मध्ये जवळपास अशीच स्थिती आहे तर रिसोड नगरपरिषद याला अपवाद नाही. महाविकास आघाडीच्या वतीने नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर केल्याची चर्चा सर्वत्र होत असताना मात्र त्याला आणखी महाविकास आघाडी कडून दुजोरा मिळालेला नाही नगरपरिषद मधील प्रत्येक प्रभागात सर्व इच्छुक उमेदवार संपूर्ण ताकदीनिशी कामाला लागले आहे रिसोड शहरातील समस्या व त्यासाठी करावे लागणारे उपाय यासाठी उमेदवार मतदारांना पुरळ घालत आहे सर्वच पक्षाकडून इच्छुक असल्यामुळे प्रत्येक प्रभागात कार्यकर्त्यांची मोठी अवगर्दी झाली आहे काही उमेदवार कामाच्या नवे तर पैशाच्या जोरावर निवडून येण्याची भाषा करीत आहेत तर काही उमेदवार पैशापेक्षा जनसेवेला महत्त्व देत नगरसेवक होण्याची स्वप्न पाहत आहेत नगरपरिषद तथा जिल्हा परिषद निवडणुकीकरिता इच्छुक असणारे आणि योग्यता असणारे कार्यकर्ते युती आघाडीच्या राजकारणामुळे अडचणीत येणार हे नक्की.

## सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचा मोळी पूजनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी( रघुनाथ देवकर):**

सांगली सातारा सोलापूर जिल्ह्याच्या सरहद्दीवर सद्गुरु श्री श्री रविशंकरजी तथा गुरुजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व त्यांच्या प्रेरणेने (राजेवाडी) श्री श्रीनगर ता. आटपाडी या ठिकाणी गेली तेरा वर्ष शेतकऱ्यांच्या हितासाठी व त्यांची जीवनमान उंचावण्यासाठी सुरू असलेल्या सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचा चौदाव्या गळीत हंगामाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमत: कारखान्याचे चेअरमन एन. शेषागिरी रावसर, व्हॉइस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील यांचे शुभ हस्ते चंडी होमाचा विधी धार्मिक पद्धतीने करण्यात आला. कारखान्याचे ॲग्री विभागाचे श्री व सौ सुनील चव्हाण यांचे शुभ हस्ते श्री सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. त्यानंतर श्री संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज ह भ प बापूसाहेब देहूकर (मळोली) यांचे चेअरमन एन.शेषागिरी रावसर, व्हॉईस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर उदय जाधव, कारखान्याचे सीएफओ




रोहित नारा, संचालक मोहन बागल, उषाताई मारकड, श्रावण दादा वाकसे, राजेवाडी विकास संस्थेचे चेअरमन रवींद्र शिरकांडे,, शेतकरी संघटनेचे कांतीलाल नाईक नवरे ( पंढरपूर),वस्ताद महादेव ठवरे, ज्योतीराम अवताडे, शामतात्या मदने

या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये फटाक्यांच्या आतषबाजी मध्ये व तोफांच्या सलामीत व जय गुरुदेव च्या जयघोषामध्ये अनेक पुष्पमालांची उधळण करून अतिशय उत्साही वातावरणामध्ये 14 व्या गळीत हंगामाचा मोळी पूजनाचा कार्यक्रम उत्साही वातावरणामध्ये पार पडला. चेअरमन एन. शेषागिरी रावसर यांच्या अध्यक्षतेखाली मान्यवरांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करून सद्गुरु श्री. श्री .रविशंकर जी तथा गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रसमाला सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर उदयजी जाधव यांनी कारखाना स्थापनेपासून आजच्या चौदाव्या गळीत हंगामापर्यंत कारखान्याच्या कार्याचा लेखाजोखा सांगत आपल्या या कारखान्याला सर्व सभासद शेतकरी बांधव व सर्व क्षेत्रातील घटकांचे सहकार्य लाभलेले आहे, ते भविष्यातही लाभणार आहे. आपण कारखान्याच्या माध्यमातून प्रामाणिकपणाच्या भावनेतून आपलं कार्य निश्चितपणाने पुढे नेणार आहोत यात शंका नाही असे सांगत कारखान्याच्या प्रगतीचा आलेख सर्व उपस्थितांसमोर मांडला. त्यानंतर श्यामतात्या मदने, ज्योतीराम अवताडे, गणेश अवताडे तसेच शेतकरी संघटनेचे कांतीलाल नाईक नवरे यांनीही उदाहरणातून आपल्या या सद्गुरु कारखान्याच्या प्रामाणिकपणाबद्दल कौतुक करून हा कारखाना आपला व माझा आहे हीच भावना कायमस्वरूपी सर्वांनी टिकवली पाहिजे अशा प्रकारचे आवाहन केले. तर ह. भ. प .बापूसाहेब देहुकर महाराज यांनी आपल्या मार्गदर्शन पर आशीर्वचनातून कारखान्याबद्दल गौरवोद्गार काढून आपल्या कारखान्याचा मी सभासद या नात्याने व धार्मिक क्षेत्रातील वारकरी पंथाच्या वतीने कारखान्याची उत्तरोत्तर प्रगती होवो व हा कारखाना चंद्र सूर्य असेपर्यंत प्रगतीपथावरच राहणार आहे अशा प्रकारचा आशीर्वाद दिला. तर आपल्या अध्यक्षीय भाषणातून कारखान्याचे चेअरमन एन .शेषागिरी रावसर यांनी उपस्थितांसमोर आमच्या कारखान्याला आपणा सर्वांची कायम व सदैव साथ व मदत हवी आहे. आम्ही "सेवा निसर्गाची उन्नती आपली" या ध्येयाने प्रेरित होऊन सद्गुरु श्री. श्री. रविशंकरजी तथा गुरुजी यांनी दिलेल्या शिकवणीप्रमाणे "समाजसेवा ब्रीद आमुचे स्वार्थ सुखाची आच नसे समाजकारणी देह वाहावा एकमात्र हा ध्यास असे" या उक्तीप्रमाणे सरळ मार्गातून मार्गक्रमण करत राहणार आहोत. आपण आम्हाला सदैव सहकार्य करून पाठीशी उभे रहा अशा प्रकारचे वक्तव्य केले. सदर प्रसंगी सौ. जयश्रीताई वाकसे, काझी मॅडम, तसेच प्रसिद्ध बागायतदार संग्राम दुपडे, हिंगणी येथील काका माने, जनरल मॅनेजर सत्यनारायण रेड्डी, डीजीएम भगवान पाटील, सर्व खाते प्रमुख ,कामगार, कर्मचारी तसेच आटपाडी, पंढरपूर, माण, माळशिरस ,सांगोला, पंढरपूर भागातील मान्यवर त्याचप्रमाणे हितचिंतक तसेच राजेवाडी,इटकी, दिघंची, हिंगणी भागातील असंख्य मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी एच आर व एडमिन मॅनेजर सचिन खटके, शेतकी अधिकारी दत्ता क्षीरसागर यांच्या टीमने परिश्रम घेतले.तर कारखान्याचे संस्थापक संचालक श्रावण दादा वाकसे यांनी आपल्या आभार प्रदर्शनातून सर्व उपस्थितांचे कौतुक करून सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केन मॅनेजर सुनील सावंत व रघुनाथ देवकर यांनी केले.कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

## पनवेलमध्ये विमा कंपनी मॅनेजरने पाहुणचाराच्या बहाण्याने केला बलात्कार तर पत्नीने चित्रीकरण करून उकळी खंडणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :**




पनवेल शहरातून कॉर्पोरेट जगतातील काळं सत्य उघडकीस आलं आहे. विमा कंपनीत उच्च पदावर कार्यरत असलेल्या एका शाखा व्यवस्थापकाने आपल्या महिला सहकाऱ्याशी पाहुणचाराच्या बहाण्याने रचलेली घातक योजना अखेर उघड झाली आहे. या घटनेनं पनवेल परिसरासह व्यावसायिक क्षेत्रात मोठी खळबळ माजली आहे.अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रदीप नामदेव नरळे (वय ३४) असून तो अंधेरी येथील एका विमा कंपनीत ब्रँच मॅनेजर म्हणून काम करत होता. त्याच्यासोबत गुन्ह्यात पत्नी रेणुका नरळे आणि भाऊ प्रविण नरळे हेही सहभागी असल्याचे तपासात समोर आले आहे. हे दोघे सध्या फरार असून पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार केलं आहे.

प्रदीप नरळेची ओळख नागपूर शाखेत कार्यरत असलेल्या ३२ वर्षीय महिला सहकाऱ्याशी कंपनीच्या ऑनलाइन मीटिंगदरम्यान झाली होती. कामाच्या निमित्ताने वाढलेलं संभाषण पुढे वैयक्तिक नात्यात बदललं. त्यानंतर २७ मार्च रोजी कामानिमित्त मुंबईत आलेल्या महिलेला नरळेने पनवेल येथील आपल्या घरी बोलावलं. पाहुणचाराच्या बहाण्याने जेवणात गुंगी आणणारे औषध मिसळून ती शुद्ध हरपल्यावर तिचे चारित्र्यहनन करण्यात आल्याचं तपासात उघड झालं आहे. धक्कादायक बाब म्हणजे या संपूर्ण घटनेचं चित्रीकरण आरोपीची पत्नी रेणुका नरळे हिने केल्याचे पुरावे मिळाले आहेत. त्यानंतर या दाम्पत्याने व्हिडिओ दाखवून संबंधित महिलेला धमकावत तिच्याकडून लाखो रुपयांची खंडणी उकळली. या सर्वातून त्रस्त झालेल्या महिलेने अखेर धैर्य एकवटून पोलिसांत तक्रार नोंदवली.

तक्रार मिळताच पोलिसांनी सापळा रचून प्रदीप नरळे याला ताब्यात घेतलं. आरोपींवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे

## रहेमान सय्यद यांना सरपंच सेवा संघाचा मानाचा समाजभुषण पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :मारुती सत्रे**

सरपंच सेवा संघाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय स्वराज्य सरपंच सेवा संघ सन्मान सोहळा २०२५ या सोहळयात पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यदअली सय्यद यांना मानाचा राज्यस्तरीय समाजभुषण २०२५ पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा आज गुरुवार दिनांक ३० ऑंक्टोबर २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता माऊली संकुल सभागृह सावेडी रोड अहिल्यानगर येथे होणार आहे. या सोहळयास सरपंच सेवा संघाचे समर्थक बाबासाहेब पावसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे,कालभक्त श्रीमहंत, डॉ.श्रीकांतदास धुमाळ महाराज उज्जैन, ग्रामसेवक नेते एकनाथ ढाकणे, यादवराव पावसे पाटील व रोहित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तसेच विविध श्रेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत. कडा ता.आष्टी जि.बीड येथील धडाडीचे, निस्वार्थपणे समाजसेवेचे कार्य करणारे पत्रकारिता व सामाजिक श्रेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केलेले पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यदअली सय्यद यांच्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली.असून हा पुरस्कार त्यांच्या कार्यावरील निष्ठा आणि परिश्रमाचे प्रतिक मानले जात आहे.या राज्यस्तरीय सन्मानामुळे पत्रकारिता व सामाजिक श्रेत्रातील रहेमान सय्यद यांच्या कार्याची दखल घेण्यात आली असून बीड जिल्ह्यासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. राज्यभरातून पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते सह इतर मान्यवर आणि सरपंच सेवा संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या प्रेरणादायी व गौरवशाली सोहळ्याच्या कार्यक्रमाला मित्र परिवारासह सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन रहेमान



सय्यद यांनी केले आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल रहेमान सय्यद यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## नेरुळ–उरण लोकल १२ डब्यांची करावी तसेच फेऱ्या वाढवाव्यात - प्रितम म्हात्रे यांचा पाठपुरावा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

"प्रवाशांच्या हिताची मागणी रेल्वे प्रशासनाकडे"

"रेल्वे प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय लवकरच जाहीर होईल"

उरण परिसरातील प्रवाशांना दररोज भेडसावणाऱ्या गर्दीच्या आणि असुविधेच्या पार्श्वभूमीवर नेरुळ–उरण लोकल ट्रेन ९ डब्यांऐवजी १२ डब्यांची करण्यात यावी तसेच या मार्गावरील फेऱ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी करणारे स्मरणपत्र दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM), छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई यांना देण्यात आले.

या अगोदरही २७ नोव्हेंबर २०२४ रोजी याच विषयावर लेखी मागणी करण्यात आली होती. त्यानंतर सदर विषयात रेल्वे प्रशासनाच्या सकारात्मक बैठका झाल्या. मात्र अद्याप त्या संदर्भात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने ही मागणी पुन्हा करण्यात आली आहे.

दररोज प्रवास करणारे शाळकरी विद्यार्थी, महिला आणि नोकरदार वर्ग यांना गर्दीमुळे मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा



लागतो. वाढत्या प्रवासीसंख्येमुळे सध्या धावणाऱ्या ९ डब्यांच्या लोकल अपुऱ्या पडत असून प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या आणि सोयीच्या दृष्टीने ही मागणी अत्यंत तातडीची असल्याचे स्मरणपत्रात नमूद करण्यात आले आहे.

## खा. भास्कर भगरे यांचे नवी दिल्ली येथे शेतकरी हितासाठी ठोस पाऊल; केंद्रीय कृषी मंत्र्यांची भेट शेतकऱ्यांच्या ज्वलंत मागण्यांवर सविस्तर चर्चा

**दैनिक युवक आधार/**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

(पिंपळगाव बसवंत) नवी दिल्ली येथे दिंडोरी लोकसभा मतदार संघातील लोकप्रिय खासदार भास्करराव भगरे सर व नाशिक लोकसभेचे खासदार श्री. राजाभाऊ वाजे साहेब यांनी केंद्रीय कृषीमंत्री श्री. शिवराजसिंह चौहान साहेब यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली.

या भेटीत दिंडोरी तसेच नाशिक लोकसभा क्षेत्रासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्यांच्या हिताच्या मागण्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान पुढील महत्त्वाच्या मागण्या मंत्री महोदयांकडे सादर करण्यात आल्या:

**शेतकरी हिताच्या प्रमुख मागण्या:**

संपूर्ण कर्जमाफीची अंमलबजावणी करून शेतकरी आत्महत्यांना आळा घालावा.

कांदा उत्पादकांना न्याय मिळावा म्हणून निर्यात धोरण शेतकरी हिताचे ठरवावे व तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात.

द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना सततच्या पावसामुळे झालेल्या प्रचंड नुकसानीबाबत भरीव आर्थिक मदत जाहीर करावी.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भात, सोयाबीन, मका, टोमॅटो आणि भाजीपाला



पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी.

या सर्व मागण्या शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनरुत्थानासाठी आणि शेती टिकवण्यासाठी अत्यावश्यक असल्याचे खासदार भास्करराव भगरे व खासदार राजाभाऊ वाजे यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले.

**शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय लवकरच अपेक्षित!**

आम्हाला पूर्ण विश्वास आहे की केंद्रीय कृषीमंत्री श्री. शिवराजसिंह चौहान साहेब शेतकरी हिताच्या या मागण्यांबाबत सकारात्मक आणि ठोस निर्णय घेतील. ही बैठक शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे असे उपस्थित प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

## "चांगले ज्ञान देऊन आणि ते आत्मसात करून आपल्या सृष्टीचे कल्याण करावे"

आपल्या सर्वांना नम्रविनंती आहे की आजवर जे ज्ञान परमात्मा-सद्गुरूंच्या अनुमतीने माझ्या लिखाणा द्वारे मी स्मिताक्षी एकमात्र शून्य बनून निःस्वार्थ भावनेने आपणास देत आली आहे.ते वाचल्याने आपल्या आत्म्यास स्व अनुभूती होत असेल आणि माझ्या लिखाणात सत्य जाणवत असेल तर आपल्या नातेवाईक,मित्र-मैत्रीण परिवार आणि इतर ग्रुप वर पाठवावे.ह्यात मला like आणि comment ची अजिबात अपेक्षा नाही आहे .मात्र दुसऱ्यांना चांगले ज्ञान दिल्याने परमात्मा-सद्गुरूंचे कार्य सहज शक्य होण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य लाभेल ज्याने सृष्टीचे कल्याण होण्यास मदत होईल .

कारण माझा परमात्मा अनंत आहे. आता त्या अनंताची ओळख साऱ्या जगाला व्हावी म्हणून हे लिखाणाचे कार्य




करत आहे.

खरं तर आत्म्याची ओळख म्हणजेच तत्वज्ञान आणि त्यानुसार सद् भक्ती-सत्कर्मातून मिळालेला मोक्ष .चांगल्या ज्ञानावरती माझा स्वतःचा अनन्य साधारण विश्वास आहे .

कारण चांगल्या ज्ञानाच्या केवळ एकाच ठिणगीतल्या दाहक शक्तीसमोर जगातल्या सगळया नकारात्मक अडचणी भस्मसात व्हायला लागते.

म्हणून चांगले तत्वज्ञान म्हणजेच आत्मज्ञान मिळणे आहे आणि त्याने आपल्या नशीबाचे भाग्य उजळणे होय .म्हणून चांगले ज्ञान निःस्वार्थ दुसऱ्यांना देता आले पाहिजे.फक्त देणाऱ्यांनी देत जावे आणि सत्पात्री असणाऱ्यांनी घेत जावे .

म्हणून आपलं ज्ञान सत्याला धरून देण्यातंच मनाचा मोठेपणा आहे .

पैशापेक्षा आत्मज्ञान दिल्याने असत्याच्या अंधाऱ्याला चिरून सर्वत्र सत्याचा प्रकाश पसरण्याची शक्ती त्यात सामावलेली असते .

"*मुखी नाम हरीचे अन हाती काम* "
हे मनाचे ध्येय असावे .

खरे शिक्षण म्हणजे चांगली संगत आणि आत्मज्ञान होय आणि ते फक्त आणि फक्त संतांच्या ,सद्गुरुंच्या आणि परमात्माच्या चरणी लाभते .

या जगाचा भार उचलण्याची किंवा समस्या सोडवण्याची जबाबदारी काही आपल्यावर नाही आहे.

ज्याने या जगाची निर्मिती केली आहे,तो हे सगळं करण्यास समर्थ आहे .मात्र चांगले ज्ञान देऊन आपल्या आसपासचं वातावरण जितकं सुगंधित करता येईल तितकं करणे .कृतीत उत्साह असावा ,वाणीत सत्यता असावी आणि मनात परमात्माचे नामस्मरण असावे .

परमात्माची आपल्या सर्वांवरच अपार कृपा आहे .मात्र कर्मात चुकू नये आणि माणुसकीचे जतन करून त्याच्या योगाने आपण जागृत व्हायला हवे .

चांगले विचार हें तोडण्यासाठी नव्हे तर आपल्या सगळयांना जोडण्यासाठी आहे . म्हणून चांगले ज्ञान दुसऱ्यांना देऊन आपल्या सर्वांचे सहकार्य लाभावे अशी सदिच्छा आहे.

**राधे राधे**
**रामकृष्ण हरी**
**आपली ,**
**स्मिताक्षी मंगेश आंबेकर**
**उर्फ**
**स्मिताक्षी सूर्यकांत चिपळूणकर .**

# राष्ट्रीय एकता दिन : राष्ट्रनिर्मितीचा समाजशास्त्रीय पाया

दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी भारतभर 'राष्ट्रीय एकता दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नसून भारताच्या एकात्मतेच्या, अखंडतेच्या आणि राष्ट्रीय भावनेच्या मूळ तत्त्वांचा उत्सव आहे. या दिनाचे औचित्य स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वात दृढ इच्छाशक्तीच्या, दूरदर्शी आणि संघटनशक्तीचे प्रतीक असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीशी संबंधित आहे. 'लोहपुरुष' म्हणून ओळखले जाणारे पटेल यांनी विविध संस्थानांचे विलीनीकरण करून अखंड भारताचा पाया रचला. त्यामुळे राष्ट्रीय एकता दिन हा केवळ एका नेत्याच्या स्मृतीचा नव्हे, तर भारतीय समाजाच्या एकात्मतेच्या तत्त्वांचा प्रतीकात्मक दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, हा दिवस समाजाच्या ऐक्याची, सामूहिक ओळखीची आणि सामाजिक एकात्मतेची पुन्हा आठवण करून देतो.

भारतीय समाजाची रचना विविधतेने नटलेली आहे. धर्म, जात, भाषा, प्रांतिकता, संस्कृती, वंश या सर्व स्तरांवर असंख्य भेद आहेत. या विविधतेतून एक सशक्त राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे हे केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही मोठे आव्हान होते. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाइम यांच्या मते, समाजाचे अस्तित्व 'सामाजिक एकात्मते'वर (Social Solidarity) अवलंबून असते. ही एकता दोन प्रकारची असते, यांत्रिक आणि सजीव एकता होय. भारतासारख्या विविधतेने भरलेल्या देशात सजीव एकात्मता आवश्यक आहे, जी विविध गटांच्या परस्परावलंबित्वातून आणि सहकार्याच्या भावनेतून निर्माण होते. राष्ट्रीय एकता दिन हे या सजीव एकात्मतेच्या तत्त्वाचे प्रतीक आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतासमोर असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे विविध प्रांत, भाषा आणि संस्कृती यांना एकत्र आणून 'राष्ट्र' म्हणून एक नवीन सामाजिक ओळख निर्माण करणे. सरदार पटेल यांनी राजकीय पातळीवर ज्या 'संघटन'ची चळवळ चालवली, ती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'सामाजिक एकत्रीकरणा'चे (Social Integration) उत्तम उदाहरण आहे. त्यांनी ५६० हून अधिक संस्थानांचे भारतात विलिनीकरण केले, परंतु ही प्रक्रिया केवळ राजकीय नव्हती. ती मानसिक, सांस्कृतिक आणि सामाजिक पातळीवरही लोकांना एका धाग्यात बांधणारी होती.

आजच्या काळात, राष्ट्रीय एकतेची संकल्पना केवळ भौगोलिक अखंडतेपुरती मर्यादित राहिलेली नाही. ती सामाजिक न्याय, समता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि संविधाननिष्ठेच्या मुल्यांवर आधारलेली आहे. भारतीय संविधानाने 'एकता आणि अखंडता' हा राष्ट्राचा मूलभूत उद्देश ठरवला आहे. समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांच्या मते, राष्ट्र हे केवळ राजकीय घटक नसून, सामायिक सांस्कृतिक स्मृती, परंपरा आणि मूल्यांनी बांधलेली सामाजिक रचना असते. म्हणूनच राष्ट्रीय एकता ही सामाजिक संबंधांच्या, सामायिक भावनांच्या आणि सामूहिक स्मृतींच्या जाळ्यावर आधारलेली असते. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक एकात्मतेस नव्या स्वरूपाची आव्हाने आहेत. डिजिटल माध्यमांद्वारे माहितीचा प्रसार जरी वेगाने होत असला तरी त्यातून मतभेद, असहिष्णुता, ध्रुवीकरण आणि विभाजनाच्या प्रवृत्ती वाढत आहेत. अशा वेळी राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य आपल्याला समाजातील तुटकेपणा ओळखून पुन्हा बांधणी करण्याची जबाबदारी स्मरवते. एकतेचा अर्थ सर्वांच्या मतांचे एकसंधीकरण नव्हे, तर विविधतेतून सामंजस्य साधणे हा आहे.




भारतीय समाजशास्त्रात एकतेची संकल्पना 'विविधतेत एकता' (Unity in Diversity) म्हणून विश्लेषित केली गेली आहे. ही संकल्पना केवळ घोषवाक्य नसून भारतीय सामाजिक जीवनाचा आत्मा आहे. समाजशास्त्रज्ञ जी.एस. घुर्ये, एम.एन. श्रीनिवास आणि आंद्रे बेटे यांनी भारतीय समाजातील परस्परसंवाद आणि परस्परावलंबित्वावर भर देऊन एकतेचा समाजशास्त्रीय पाया स्पष्ट केला आहे. उदा. घुर्ये यांच्या मते भारतीय समाजात जातिभेद असला तरी परस्परपूरकतेचा एक धागा कायम राहिला आहे, ज्यामुळे समाजाचे विघटन झाले नाही. आजही राष्ट्रीय एकतेचा पाया या परस्परपूरक सामाजिक संबंधांमध्ये आहे. राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने आपल्याला हे लक्षात घ्यावे लागते की, राष्ट्र हे केवळ भौगोलिक मर्यादांमधील जनसमूह नव्हे, तर एकत्रित सामूहिक चेतना आहे. समाजशास्त्रज्ञ अँथनी स्मिथ यांनी "Ethno-symbolism" या संकल्पनेत राष्ट्रनिर्मितीत सांस्कृतिक प्रतीकांचे आणि ऐतिहासिक स्मृतींचे महत्त्व स्पष्ट केले आहे. सरदार पटेल यांचे कार्य हे अशाच प्रतीकात्मक राष्ट्रनिर्मितीचे उदाहरण आहे. त्यांनी भारतातील विविध जात, धर्म, भाषिक आणि प्रांतिक समुदायांना एकत्र आणण्यासाठी सांस्कृतिक प्रतीकांचा वापर केला, जसे की अखंड भारताची कल्पना, भारतीय ध्वज, संविधान, आणि सामूहिक राष्ट्रीय ओळख. परंतु आजच्या काळात या एकतेसाठी नव्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. प्रादेशिक अस्मिता, धार्मिक कट्टरता, भाषिक संघर्ष, सामाजिक विषमता आणि आर्थिक असमानता यांमुळे राष्ट्रीय ऐक्याचे सूत्र ढवळून निघत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे 'सांस्कृतिक विसंवाद' (Cultural Dissonance) म्हणून समजले जाते. या विसंवादावर मात करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने समानतेची, सहिष्णुतेची आणि बंधुत्वाची भावना आत्मसात करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकता ही केवळ राज्यकर्त्यांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे.

राष्ट्रीय एकता ही आर्थिक, राजकीय आणि सामाजिक स्तरावरही प्रतिबिंबित होते. आर्थिक विषमता वाढल्यास सामाजिक एकात्मता ढासळते, कारण समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांच्या मते, वर्गसंघर्ष हा समाजाच्या तुटकतेचा मूळ घटक आहे. म्हणून राष्ट्रीय एकतेसाठी सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता हे अपरिहार्य घटक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही 'राजकीय लोकशाही'सोबत 'सामाजिक लोकशाही'चे महत्त्व अधोरेखित केले आहे. ते म्हणतात, "राजकीय समता टिकवण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक समता आवश्यक आहे." हीच समता राष्ट्रीय एकतेचा आधार आहे.

आजच्या तरुण पिढीसमोर जागतिक पातळीवर स्पर्धा, सांस्कृतिक मिश्रण आणि विचारसरणींचे विविध प्रवाह उभे आहेत. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृतीतील 'विविधतेत एकता' हा मूलमंत्र त्यांना सामाजिक संतुलन राखण्याची प्रेरणा देतो. शिक्षण प्रणाली, माध्यमे, सामाजिक चळवळी आणि नागरिक समाज या सर्व घटकांची भूमिका राष्ट्रीय एकतेला दृढ करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. समाजशास्त्रज्ञ पियरे बुरदिऊ यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) संकल्पनेनुसार, शिक्षण आणि संस्कृती या सामाजिक एकात्मतेचे महत्त्वाचे साधन आहेत. त्यामुळे शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांनी एकतेची आणि संवेदनशील नागरिकत्वाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवली पाहिजेत. राष्ट्रीय एकता दिन हा केवळ भूतकाळातील योगदानाची आठवण नाही, तर भविष्यातील जबाबदारीची जाणीव आहे. आज सामाजिक माध्यमांवरील ध्रुवीकरण, धार्मिक तणाव आणि ओळखींच्या राजकारणामुळे राष्ट्रीय भावना कमजोर होत आहे. या पार्श्वभूमीवर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून राष्ट्रीय एकतेचा पुनर्विचार आवश्यक आहे. सामाजिक संस्थांचे पुनर्बांधणीकरण, समावेशक धोरणे आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वास पुनर्स्थापित करणे हे यासाठी आवश्यक आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याचे 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हे केवळ स्मारक नसून भारताच्या अखंडतेचे प्रतीक आहे. ते आपल्याला आठवण करून देते की राष्ट्राची शक्ती भौगोलिक विस्तारात नाही, तर नागरिकांच्या अंतःकरणात आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या ही एकता सामूहिक भावना, सहजीवन आणि परस्पर आदरावर आधारलेली आहे. म्हणूनच राष्ट्रीय एकता दिन आपल्याला भेदभावाच्या भिंती पाडून सहकार्याचे पूल बांधण्याची प्रेरणा देतो.

शेवटी, राष्ट्रीय एकता म्हणजे विचार, संस्कृती आणि मूल्यांचा संगम आहे. ती कोणत्याही एका वर्चस्वावर नव्हे, तर सर्वांच्या सहभागावर आधारित आहे. समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेंसर यांच्या मते, समाज एक जीवंत शरीर आहे, त्यातील प्रत्येक घटकाने आपले कार्य समन्वयाने पार पाडले, तरच ते शरीर निरोगी राहते. भारताचे हे सामाजिक शरीर तेव्हाच सशक्त राहील, जेव्हा आपण धर्म, जात, भाषा, प्रांत यापलीकडे जाऊन एक भारतीय म्हणून विचार करू. राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने आपल्याला केवळ सरदार पटेलांच्या कार्याचे स्मरण करायचे नाही, तर त्यांच्या एकात्मतेच्या विचारांचा वारसा कृतीत उतरवायचा आहे. आज भारताला गरज आहे ती केवळ विकासाची नव्हे, तर मूल्याधारित एकतेची. समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान राखत, असमानता दूर करत आणि संविधानातील मूल्यांचे पालन करत आपण खऱ्या अर्थाने एकात्म राष्ट्र घडवू शकतो. कारण राष्ट्रनिर्मिती हा एक दिवसाचा उत्सव नसून सातत्याने चालणारी सामाजिक प्रक्रिया आहे आणि त्याचे केंद्रबिंदू आहे राष्ट्रीय एकता.

**- डॉ. राजेंद्र बगाटे, (समाजशास्त्राचे अभ्यासक)**

---

### जिल्हास्तर युवा महोत्सव २०२५-२६ युवा शक्तीला मिळणार व्यासपीठ

# वक्तृत्व, लोककला आणि नवोपक्रम स्पर्धांचे आयोजन

राज्यातील युवकांमध्ये एकात्मतेची भावना जागृत करणे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मध्यमातून युवा वर्गातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी केंद्र शासनामार्फत सन १९९४ या वर्षीपासून दरवर्षी दि.१२ जानेवारी रोजी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

देशातील संस्कृती व परंपरा जतन करून या संस्कृतीचे संवर्धन करणारा प्रातिनिधीक युवा संघ वरील राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होतो. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे या कार्यालयाद्वारे युवा दिन, युवा सप्ताह व युवा महोत्सव निमित्ताने युवांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय, राज्य, विभाग व जिल्हास्तरावर करण्यात येते.

त्यानुषंगाने क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे जिल्ह्यात युवा महोत्सव आयोजनाबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. ज्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, कथा लेखन, चित्रकला, लोकनृत्य, लोकगीत कविता लेखन, नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) या बाबींचा समावेश आहे. जिल्हास्तरावरील विजेत्यांना प्रावीण्य प्रमाणपत्र/बक्षीस रक्कम दिली जाईल. प्रावीण्य प्राप्त प्रथम व व्दितीय विजेते संघ पुढील विभाग व राज्यस्तरीय कार्यक्रमात भाग घेतील.

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्या दि. २७ ऑगस्ट २०२५ च्या पत्रान्वये राष्ट्रीय युवा महोत्सवाचे रुपांतर VBYLD मध्ये करण्यात आले असून तो विकसित भारत २०४७ या दृष्टीकोनाशी जोडण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर NYF-VBYLD-२०२६ चे आयोजन युवा कार्यक्रम व खेळमंत्रालयाकडून केले जाणार आहे, ज्यामध्ये १५ ते २९ वयोगटातील युवकांचा सहभाग अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हास्तरावर युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅक चे आयोजन होवून स्पर्धक विभागस्तरावर सहभागी होतात, त्यातून गुणी कलावंतांची निवड होवून राज्यस्तरावरील युवा महोत्सवासाठी विभागाचा संघ पाठविला जातो, त्यानुसार या जिल्हास्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅक आयोजन समिती संरचना:-

- जिल्हाधिकारी, ठाणे - अध्यक्ष, आयोजन समिती
- उपसंचालक, क्रीयुसे मुंबई - सदस्य
- जिल्हा युवा अधिकारी, नेहरू युवा केंद्र - सदस्य
- राष्ट्रीय सेवा योजना प्रमख संबंधित विद्यापीठ - सदस्य
- प्राचार्य शासकीय व निमशासकीय महाविद्यालय - सदस्य
- जिल्हा माहिती अधिकारी - सदस्य
- विज्ञान तंत्रज्ञान विषयक तज्ञ मान्यवर / प्राध्यापक / संस्था प्रतिनिधी २- सदस्य
- संगीत व नृत्य तज्ञ/ विशारद / परीक्षक -३



प्रतिनिधी - सदस्य

- जिल्हा क्रीडा अधिकारी - सदस्य सचिव

**स्पर्धांचे प्रकार (Cultural & Innovation Track):-**

१. वक्तृत्व
२. कथालेखन
३. चित्रकला
४. लोकनृत्य (गट)
५. लोकगीत (गट)
६. कविता लेखन
७. नवोपक्रम विज्ञान प्रदर्शन

- सांस्कृतिक - लोकनृत्य गट, सहभाग संख्या - १०, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.
- सांस्कृतिक - लोकगीत गट, सहभाग संख्या - १०, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.
- कौशल्य विकास - चित्रकला, सहभाग संख्या - ३, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.
- कौशल्य विकास - वक्तृत्व, सहभाग संख्या - २, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग सख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.
- कौशल्य विकास - कविता, सहभाग संख्या - २, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.
- कौशल्य विकास - नवोपक्रम विज्ञान प्रदर्शन, सहभाग संख्या - ३, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.

**बक्षिसांचा तपशील:**

- समूह लोकनृत्य - प्रथम - ७ हजार, द्वितीय - ५ हजार, तृतीय - ३ हजार
- समूह लोकगीत - प्रथम - ५ हजार, द्वितीय - ३ हजार, तृतीय - २ हजार ५००
- कथा लेखन - प्रथम - ३ हजार, द्वितीय - २ हजार, तृतीय - १ हजार ५००
- चित्रकला स्पर्धा - प्रथम - ३ हजार, द्वितीय - २ हजार, तृतीय - १ हजार ५००
- वक्तृत्व - प्रथम - ३ हजार, द्वितीय - २ हजार, तृतीय - १ हजार ५००
- कविता लेखन - प्रथम - ३ हजार, द्वितीय - २ हजार, तृतीय - १ हजार ५००
- नवोपक्रम - विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रकल्प सादरीकरण - प्रथम - ५ हजार, द्वितीय - ३ हजार, तृतीय - २ हजार.

**जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन समितीची बैठक संपन्न**

**सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून जिल्हा युवा महोत्सव यशस्वी करावा -जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ**

जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन करण्याकरिता जिल्हास्तर आयोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झाली. या बैठकीत सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून जिल्हा युवा महोत्सव यशस्वी करावा, जास्तीत जास्त युवक-युवतींचा सहभाग वाढेल, यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी सूचित केले.

या बैठकीत संचालनालयाच्या परिपत्रकानुसार समिती गठन करण्यास मान्यता प्रदान करणे, जिल्हास्तर युवा महोत्सवाचे ठिकाण व तारीख निश्चित करणे, युवा महोत्सवाच्या अंदाजपत्रक व खर्चास मान्यता देणे या विषयांबाबत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी सूचित केले की, प्रतिवर्षी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येते, जिल्हा, विभाग, राज्यस्तर स्पर्धेमधून निवडलेला चमू राष्ट्रीय युवा महोत्सवात राज्याचे प्रतिनिधीत्व करतो. युवा महोत्सवाच्या जिल्हास्तर आयोजन समितीमध्ये संचालनालयाच्या निर्देशानुसार ९ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, यामध्ये पदसिद्ध सदस्यांसह आमंत्रित प्रतिनिधींची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विषयक तज्ञ, संगीत विशारद प्रतिनिधी, नृत्य विशारद प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्याबाबत चर्चा होऊन मान्यता होणे आवश्यक आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**ठाणे**

---

# भारतातील या काही ठिकाणांना एक्सप्लोर करण्यासाठी पर्यटकांची झुंबड



आपल्या भारतातील दक्षिण भारत देश हा एक असा भाग आहे जो निसर्ग, संस्कृती आणि अध्यात्माचा एक अनोखा मिलाफ आहे. प्रत्येक राज्याची स्वतःची वेगळी ओळख आहे. केरळ त्याच्या हिरवळीसाठी, तामिळनाडू त्याच्या भव्य मंदिरांसाठी आणि कर्नाटक त्याच्या कॉफीच्या बागांसाठी ओळखले जाते. एकंदरीत तुम्ही जर खरोखरच फिरायला जाण्यासाठी एक चांगले ठिकाण शोधत असाल, तर दक्षिण भारतापेक्षा सर्वात उत्तम काहीच नाही. समुद्रकिनाऱ्यांपासून ते पर्वत आणि धार्मिक स्थळांपर्यंत, तुम्हाला एक अनोखा अनुभव मिळेल. स्वादिष्ट अन्न, पारंपारिक नृत्य आणि लोकसंस्कृती ही देखील दक्षिण भारताची खास वैशिष्ट्ये आहेत.

दक्षिण भारतात एक्सप्लोर करण्यासारखे बरेच काही आहे. कुठे जायचे, तिथे कसे जायचे आणि किती खर्च येईल याबद्दल लोकं अनेकदा गोंधळलेले असतात. जर तुम्ही दक्षिण भारतात फिरायला जाण्याचा विचार करत असाल तर या लेखात आम्ही दक्षिण भारतातील भेट देण्यासाठी सर्वोत्तम ठिकाणे कोणती आहेत आणि ३ दिवस फिरण्याचा खर्च किती होऊ शकतो ते जाणून घेऊयात.

**केरळमधील निसर्गाचा आनंद घ्या**

केरळ हे दक्षिण भारतातील सर्वात सुंदर शहरांपैकी एक आहे. येथील नैसर्गिक दृश्ये तुम्हाला मंत्रमुग्ध करतील. केरळ हे असे राज्य आहे जिथे तुम्हाला निसर्गाच्या सानिध्यात हरवून गेल्यासारख वाटेल. कारण हे राज्य हिरव्यागार झाडांनी भरलेले आहे.

अलेप्पीचे बॅकवॉटर, आयुर्वेदिक मसाले आणि हाऊसबोट्स हे पाहून फिरण्याचा आनंद द्विगुणित करेलच पण संस्मरणीय बनवू शकतात. मुन्नार, एक हिल स्टेशन, अलेप्पी, कोची आणि थेक्कडी अशी अनेक ठिकाणे देखील आहेत. केरळमधील कोणत्याही शहरात जाण्यासाठी तुम्ही विमान आणि ट्रेनने जाऊ शकता. केरळ फिरण्याचा खर्च तुमच्या राहण्याचा खर्च, जेवण आणि पर्यटनावर अवलंबून १०,००० ते २०,००० रुपयांपर्यंत होऊ शकतो.

---

# केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा आणि शिष्यवृत्ती परीक्षा एकाच दिवशी; हजारो शिक्षक व विद्यार्थ्यांना होऊ शकते गैरसोय!

**"शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलावी- शेख अब्दुल रहीम "**

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना 'हॅपी टू हेल्प फोंडेशन' चे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य प्रवक्ता महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे शेख अब्दुल रहीम सर यांनी एक निवेदन सादर केले आहे. या निवेदनात त्यांनी इयत्ता



5वी व 8वी शिष्यवृत्ती परीक्षा आणि केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (CTET 2026) या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी म्हणजे 8 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित करण्यात आल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

शेख अब्दुल रहीम सर यांनी नमूद केले की, या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी असल्याने राज्यभरातील अनेक शिक्षकांना अडचण निर्माण होईल. हजारो शिक्षक CTET परीक्षेला बसणार असून त्याचबरोबर ते शिष्यवृत्ती परीक्षेचे पर्यवेक्षक किंवा केंद्रप्रमुख म्हणूनही कार्य करतात. अशा परिस्थितीत दोन्ही परीक्षा सुरळीत पार पाडणे कठीण ठरेल.

त्यामुळे त्यांनी परीक्षा परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख 8 फेब्रुवारीऐवजी 15 फेब्रुवारी 2026 करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून शिक्षक, विद्यार्थी आणि प्रशासन यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही. निवेदनाची एक प्रत राज्याचे शालेय शिक्षण आयुक्त पुणे यांना ही मेल द्वारे पाठविण्यात आले आहे...

# मुदगल ते वाघाळा रस्त्यांचे भाग्य कधी उजळणार?

**दैनिक युवक आधार (तालुकाप्रतिनिधी अशोक नवघरे)**



**पाथरी:-**तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावर वसलेले मुदगल हे राज्यासह परराज्यात दुसरी काशी विश्वनाथ म्हणून सुप्रसिद्ध आहे या मुदगल येथे मुदगलेश्वर देवस्थान सर्वात्र परिचित आहे परंतु या मुदगल ते वाघाळा फाटा या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असल्यामुळे वाहन चालविणे अवघड झाले आहे खड्डे चुकविण्याच्या नादात अनेक प्रवाशांना आपला जीव गमावला आहे आणि वाहनचालक खाली पडून जखमी झाले असून याकडे सर्वाजनिक बांधकाम विभागाने तात्काळ मुदगल ते वाघाळा फाटा रस्त्यांची दुरुस्ती करावी अशी मागणी भाविकांची होत आहे पाथरी तालुक्यातील रस्त्याच्या कामाकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष दिसून येत आहे एखादा गुत्तेदारांने रस्ता केल्यानंतर दोन वर्षांत रस्त्यावर खड्डे पडतात त्यामुळे शासनाचे लाखो रुपये खड्ड्यात जात असताना ही याचे सोयरसुतक मात्र लोकप्रतिनिधीला नसल्याचे दिसून येत आहे

मुदगल ते वाघाळा फाटा रस्त्यांचे काम गेल्या तीन ते चार वर्षांपूर्वी झालेले असताना आता या रस्त्यावर जागोजागी मोठं मोठी खड्डे पडले आहेत

यामुळे वाहनचालकांना वाहन चालविणे वाटेवरची कसरत करावी लागत आहे तरी या रस्त्याची दुरुस्ती तात्काळ करावी अशी मागणी भाविकांची व प्रवाशांची होत आहे


# करंजाडे पाणीप्रश्नावर शिवसेनेचा मोठा लढा


## सेक्टर ५, ५A, ६ साठी स्वतंत्र 'Underground GSR' ची सिडकोकडे मागणी !

**दैनिक युवक आधार करंजाडे प्रतिनिधी,**

करंजाडे नोडमधील सेक्टर ५, ५A आणि ६ येथील नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावणाऱ्या गंभीर पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आज (मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर २०२५) सिडको प्रशासनाकडे निर्णायक मागणी केली आहे

रायगड जिल्हाप्रमुख (उरण) मा. आमदार श्री. मनोहर शेठ भोईर साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार, तालुकाप्रमुख श्री महेंद्र गायकर साहेब , वडघर विभाग प्रमुख श्री नंदकुमार मुंडकर, करंजाडे विभाग प्रमुख श्री रोहिदास भोईर यांच्या मार्गदर्शना नुसार करंजाडे शहरप्रमुख श्री. संदीप भास्कर चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.









**प्रमुख मागणी:**

सेक्टर ५, ५A आणि ६ मधील पाणीप्रश्न कायमस्वरूपी मिटवण्यासाठी स्वतंत्र 'Under-ground Ground Service Reservoir (GSR)' पाण्याची टाकी तातडीने उभारावी.

GSR मुळे पाण्याचे योग्य नियोजन होऊन सर्व रहिवाशांना मुबलक पाणीपुरवठा होईल.

**सिडकोकडून सकारात्मक प्रतिसाद:**

यावेळी सिडको पाणीपुरवठा विभागाचे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर श्री. गायकवाड साहेब आणि श्री. वीरेंद्र पाटील साहेब यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. त्यांनी या मागणीला अनुकूलता दर्शवत, हा विषय व्यवस्थापकीय संचालक (MD) यांच्यासमोर अग्रक्रमाने मांडून प्राधान्याने नियोजन करण्याचे आश्वासन दिले.

करंजाडे शहरप्रमुख श्री. संदीप भास्कर चव्हाण यांनी यावेळी स्पष्ट केले की, "शहराचा विस्तार वाढत असताना पाणी आणि मूलभूत सुविधा पुरवण्यात कमतरता भासल्यास, १२.५०% वस्तीत भविष्यात मोठे संकट उभे राहील. सिडकोने तात्काळ दूरदृष्टी ठेवून नागरिकांना न्याय द्यावा. तसेच करंजाडे-वडघरवासियांच्या समस्या निवारण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष कायम कटिबद्ध असून, योग्य तो न्याय मिळेपर्यंत आमचा पाठपुरावा सुरू राहील.

# नगराध्यक्ष पदासाठी आतिष चव्हाण यांच्या नावाची जोरदार चर्चा

**दैनिक युवक आधार यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**



**पांढरकवडा :** नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सर्वसाधारण जाहीर झाल्याने शहरात राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर अनेक संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत असली तरी, सध्या सर्वाधिक चर्चेत असलेले नाव म्हणजे आतिष चव्हाण यांचे आहे. सामाजिक कार्य, लोकसंपर्क आणि प्रामाणिक जनसेवा या गुणांच्या जोरावर आतिष चव्हाण हे नगराध्यक्ष पदासाठी प्रबळ दावेदार ठरू शकतात, अशी चर्चा शहरभर सुरू झाली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक क्षेत्रांमध्ये सक्रिय असलेले आतिष चव्हाण हे शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी नेहमी तत्पर असतात. त्यांनी अनेक गरजू नागरिकांना आर्थिक तसेच वैयक्तिक स्वरूपात मदत केली आहे. विशेष म्हणजे, मुक्या प्राण्यांप्रती असलेले त्यांचे प्रेमही सर्वपरिचित आहे.दररोज शहरातील भटक्या कुत्र्यांना बिस्किटे, ब्रेड तसेच मुक्या प्राण्यांना चारापाणी देण्याची त्यांनी जबाबदारी स्वतःहून घेतली आहे. या उपक्रमासाठी ते दरमहा तब्बल २५ ते ३० हजार रुपये खर्च करतात, तरीही या कार्यात त्यांचा उत्साह कमी होत नाही.

सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी युवकांना सामाजिक कार्यात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. शहरातील अनेक सामाजिक संस्था, , महिला मंडळ आणि युवक मंडळ त्यांच्या कामाची दखल घेत आहेत. सामान्य नागरिकांमध्ये त्यांच्या प्रामाणिक कार्यामुळे विश्वास वाढला असून, सामान्य माणसाचा नगराध्यक्ष म्हणून त्यांचे नाव घेतले जात आहे.आरक्षण सर्वसाधारण निघाल्यानंतर सलीम खेतानी गटाकडून आतिष चव्हाण हे नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी सादर करू शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे. त्यांच्या कार्यशैलीत अहंकारापेक्षा सेवा भाव दिसून येतो, हीच त्यांची सर्वात मोठी ताकद असल्याचे नागरिकांचे मत आहे. अनेक स्थानिक नागरिकांनी "आतिष चव्हाण हे तरुण, प्रामाणिक आणि सर्वसामान्यांच्या जवळचे व्यक्तिमत्व आहे. नगराध्यक्ष पदावर त्यांनी बसावे, अशी आमची इच्छा आहे असे मत व्यक्त केले. राजकीय क्षेत्रात जुने खिलाडी असले तरी, लोकाभिमुख कार्यामुळे त्यांनी शहरातील नागरिकांमध्ये चांगला जनसंपर्क तयार केला आहे. निवडणुकीच्या तोंडावर त्यांना मिळणारा वाढता पाठिंबा पाहता, आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीत आतिष चव्हाण हे एक प्रभावी आणि बलवान उमेदवार ठरतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, शहरात विविध गट आणि कार्यकर्ते त्यांच्याशी संपर्क साधत असून, संभाव्य उमेदवारीबाबत चर्चा सुरू आहेत. नागरिकांमध्ये त्यांच्या नावाबद्दल उत्सुकता असून, पांढरकवड्यातील नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत आतिष चव्हाण हे प्रमुख दावेदार म्हणून उदयास येत असल्याचे स्पष्ट होत आहे.

# म्हसळा तालुक्यात शिवसेना (उबाठा)चा संघटनात्मक फेरबदल — तरुणांना पुढे आणण्याचा निर्णय

**दैनिक युवक आधार म्हसळा तालुका प्रतिनिधी – शिरीष समेळ)**










आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात म्हसळा तालुक्यातील संघटनात्मक फेरबदल जाहीर करण्यात आले असून, नव्या नियुक्त्यांमुळे पक्षात नवचैतन्य संचारले आहे. संघटन मजबूत करण्याच्या हेतूने पक्षाच्या विविध पदांवर नवे, तरुण आणि सक्रिय कार्यकर्ते पुढे आले आहेत.

या फेरबदलांनुसार अभय कळमकर यांची म्हसळा शहरप्रमुख, निशा पाटील (रेवली) यांची महिला आघाडी प्रमुख, तर तुकाराम चाळके (काळसुरी) यांची तालुका प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच दीपाली कांबळे यांची उपतालुका संघटक, रेणुका मोरे यांची विभाग संघटक, विश्वनाथ विचारे (फळसप-आंबेत खाडी पट्टा) यांची तालुका संपर्कप्रमुख, अशोक पाटील (मेंदडी कोंड) यांची तालुका समन्वयक, आणि रोशन पारावे यांची उपतालुका प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

या नव्या नियुक्त्यांमुळे म्हसळा तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पक्षाच्या पुढील वाटचालीस नवी ऊर्जा मिळाल्याची भावना स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

"या नव्या नियुक्त्यांमुळे संघटन अधिक सक्षम होईल. तरुण आणि कार्यक्षम नेतृत्व पुढे येत असल्याने आगामी निवडणुकांमध्ये पक्ष निश्चितच मजबुतीने उभा राहील," — अशी प्रतिक्रिया कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आली.

पक्ष सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यंदाच्या निवडणुकीत दलबदलूंना प्रवेश नाही आणि ६० वर्षांवरील कार्यकर्त्यांना उमेदवारी न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे बहुतांश नव्या आणि तरुण चेहऱ्यांना संधी देण्याची रणनीती आखण्यात आली आहे. या निर्णयामुळे तरुण कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचं वातावरण असून, म्हसळा तालुक्यात संघटन पुन्हा जोमाने उभं राहत असल्याचं चित्र दिसत आहे.

या प्रसंगी दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख नंदू शिर्के, महिला जिल्हा संघटक स्वीटी गिरासे, नवनियुक्त उपजिल्हाप्रमुख अतुल चौगले, संपर्क प्रमुख दिलीप करंदीकर, राजेंद्र सावंत, अनंत कांबळे, शौकत हजवाने यांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शिवसेना (उबाठा) पक्षाच्या या संघटनात्मक फेरबदलांमुळे म्हसळा तालुक्यात राजकीय समीकरणांमध्ये नव्या शक्यता निर्माण झाल्या असून, स्थानिक मतदारवर्ग, विशेषतः तरुण पिढी, आता शिवसेनेकडे नव्या आशेने पाहत आहे.

# सतलोक आश्रम ढवळपुरी येथे 4 ते 6 नोव्हेंबर दरम्यान 'दिव्य धर्म यज्ञ दिवस' भव्यतेने साजरा होणार

**दैनिक युवक आधार वार्ताहर :** संपूर्ण मानवजातीसाठी कल्याणकारी ठरणारा एक अद्वितीय व ऐतिहासिक कार्यक्रम "दिव्य धर्म यज्ञ दिवस" या निमित्ताने आयोजित करण्यात आला आहे. हा पवित्र व भव्य आध्यात्मिक सोहळा संत गरीबदासजी महाराज यांच्या वाणीनुसार जगदगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांच्या पवित्र मार्गदर्शनाखाली *सतलोक आश्रम ढवळपुरी (महाराष्ट्र) येथे दि. 4, 5 व 6 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 8 ते सायंकाळी 5 या वेळेत संपन्न होणार आहे.




या तीन दिवसीय महासमागमात विविध समाजोपयोगी आणि अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने संत गरीबदासजी महाराज यांच्या वाणीचा अखंड पाठ, विशाल भंडारा, हुंडामुक्त विवाह सोहळा, रक्तदान शिबिर, नि:शुल्क नामदीक्षा तसेच आध्यात्मिक प्रदर्शनी यांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामधून समाजामध्ये समानता, बंधुता आणि खऱ्या अध्यात्मिकतेचा संदेश दिला जाणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे हुंडामुक्त विवाह सोहळा, ज्यामध्ये अनेक जोडपी कोणत्याही दिखाव्याशिवाय, फाजील खर्चाशिवाय आणि सर्व जाती-धर्मभेद विसरून एकत्र विवाहबंधनात अडकतील — हे समाजातील समता व संस्कारांचे जिवंत उदाहरण ठरणार आहे. तसेच *रक्तदान शिबिर* आणि *नि:शुल्क नामदीक्षा* द्वारे समाजसेवा आणि आत्मकल्याण दोन्हींचा संगम साधला जाईल.

संत रामपाल जी महाराज यांच्या कृपेने संपूर्ण महाराष्ट्रातून आणि देशभरातून लाखों अनुयायी व भाविक या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. सतलोक आश्रम ढवळपुरी हे या काळात अध्यात्मिक तेजाने उजळून निघणार आहे.

सर्व भाविक, श्रद्धाळू आणि नागरिकांना या पवित्र महासमागमात सहपरिवार सहभागी होण्यासाठी मन:पूर्वक आमंत्रण आहे.

स्थळ: सतलोक आश्रम, ढवळपुरी, तालुका पारनेर, जिल्हा अहिल्यानगर (महाराष्ट्र)

दिनांक: 4, 5, 6 नोव्हेंबर 2025

वेळ: सकाळी 8 ते सायंकाळी 5

संपर्क: 9992600610, 9992600620

सेवेत:सद्गुरु रामपाल जी महाराज यांची संपूर्ण संगत.

महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना या दिव्य धर्म सोहळ्यात सहभागी होऊन आत्मकल्याणाचा लाभ घ्यावा, असे सादर आवाहन करण्यात येत आहे.

# शहरात मुकी जनावरे त्वचा रोगानी त्रस्त, प्रशासनाचे दुर्लक्ष; गायीना लंपी तर कुत्र्यांना खरूज

**दैनिक युवक आधार रिसोड /प्रतिनिधी :रणजितसिह. ठाकूर**




शहरात सर्वत्र मोकाट जनावरे फिरताना किंवा रस्त्याच्या मधोमध बसलेले दिसणं हे काही नवीन नाही.असे भटकंती करणारे मोकाट जनावरे नाही दिसलें तर नवलच त्याची सवयही रिसोड करानी करून घेतली आहे. तक्रार करावी तर कुठे आणि दखल घ्यावी तर कुणी? एक तर जनावर आणि त्यातही मोकाट म्हणजे नेमक याला वाली कोण?त्यांची जबाबदारी कोणाकडे असा प्रश्न सामान्य नागरिकांना सतावते आहे. प्रशासकीय यंत्रणा ही फक्त नावापुरतीचं आहे का?असे अधिकारी कर्मचारी म्हणजे पंढरा हत्ती पोषनासारखे झाले आहे.

सध्या हा प्रश्न केवळ मोकाट जनावरापुरता मर्यादित राहला नाही तर या मोकाट जाणवरापैकी अधिकांश त्वचा रोगाने ग्रासलेले आहे. गाईना लंपी सारखा आजार जडला आहे त्यामुळे त्यांची त्वचा जखमानी खराब झाली आहे. तर कुत्र्यांना खरूज सारखा आजार झाला त्यामुळे त्यांची त्वचा खराब झाली. ही आजाराने ग्रस्त जनावरे बेदिक्कतपणे मुक्तपणे शहरात संचार करतात आणि हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे एकापासून इतरही जनावरे बाधित होत आहेत. याच्यावर त्वरित उपचार न केल्यास हा जाणवरांच्या रोगाचा प्रादुर्भाव माणसापर्यंत पोहचायला वेळ लागणार नाही.

नगर परिषद आणि पशु वैद्यकीय विभाग यांनी आपसी ताळमेळ बसवून या जनावरावर तात्काळ उपचार करण्याची गरज आहे.

पशुवैद्यकीय विभागात असणारे अधिकारी सुट्टीच्या दिवशी स्वतःचा मोबाईल बंद ठेवून संपर्कक्षेत्राच्या कर्तव्य क्षेत्राच्यही बाहेर असतात.


त्यांच्याशी संपर्क केला तर मोकाट जनावरे नगर परिषद ने एकत्रित करावी म्हणजे उपचार करता येतील असा युक्तिवाद करतात तर वीस दिवसापूर्वी तसें पत्र नगरपरिषदला दिल्याचा त्यांनी उल्लेख केला. म्हणजे नगर परिषद आणि पशुवैद्यकीय अधिकारी आणि या जनावराचा उपचार करावा हे अपेक्षित आहे. तर पशुप्रेमी व समाजसेवी व्यक्तींनी, संस्थानी पुढाकार घेऊन या मुक्या जनावरांना त्यांना या असह्य रोगातून मुक्ती देण्यासाठी आपला मदतीचा हात पुढे करावा म्हणजे शहरातील जनावरे बरे होतील.

# 'गोशाळेत पंडित उमेश चौधरी' यांच्या गाण्याची संगीत माधुरी

**दैनिक युवक आधार पनवेल (प्रतिनिधी)**

परिया येथील बेकल गोकुलम गोशाळा येथे 'परंपरा विद्यापीठा'च्या वतीने आयोजित पाचव्या दीपावली संगीत महोत्सवात रायगडचे सुपुत्र प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित उमेश चौधरी यांच्या सुमधुर गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या गाण्याच्या माधुर्याने संपूर्ण गोशाळा रसिकांच्या टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेली. यावेळी त्यांच्या गायकीने गोशाळेचा परिसर मंगलमय झाला होता.

केरळ राज्याच्या उत्तर भागात, कासरगोड जिल्ह्यातील रमणीय अळक्कोडे या गावात, ऐतिहासिक बेकल किल्ल्याजवळ, ही गोकुलम गोशाळा व श्रीकृष्ण मंदिर वसलेले आहे.या पवित्र स्थळातून प्रेम, परंपरा आणि निसर्गाशी संतुलित सहजीवन यांचा दिव्य संदेश आजही प्रसारित होत आहे. गोकुलम गोशाळा ही सनातन धर्माच्या संस्कृतीचे सजीव प्रतीक मानली जाते. त्यामुळे अशा पवित्र आणि आध्यात्मिक वातावरणात आयोजित झालेला हा संगीत महोत्सव अधिकच मंगलमय आणि अध्यात्मिक ऊर्जेने ओतप्रोत झाला. दिनांक २० ऑक्टोबर ते ०१ नोव्हेंबर पर्यंत म्हणजेच तेरा दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचे उदघाटन उद्योगपती व भारतीय गोसंरक्षण चळवळीचे कार्यकर्ते महावीर सोनिका यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी गोशाळेचे संस्थापक विश्णुप्रसाद हेब्बार, डॉ. नागरत्ना हेब्बार, संगीतगुरू वेल्लिकोट विश्णुभट्ट, तसेच प्रसिद्ध संगीतविद्वान थामरशैरी ईश्वरन भट्टथिरी उपस्थित होते. नेहमीप्रमाणे पं. उमेश चौधरी यांनी या महोत्सवातसुद्धा शास्त्रीय गायनाची किमया अधोरेखित करत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. त्यामुळे यावेळी हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या रसिक प्रेक्षकांनी व मान्यवरांनी त्यांच्या गायनाला भरभरून दाद दिली तसेच त्यांच्या गायनाची स्तुती केली. यावेळी तबल्यावर गणेश भागवत तर हार्मोनियमवर सतीश हेग्गर यांची वाद्य साथ लाभली. महोत्सवाच्या प्रारंभी उडुपीचे पावन आचार्य यांच्या नेतृत्वाखाली पंचवाद्य वीणेचा रंगतदार कार्यक्रम पार पडला. इडयार बंधू, उषा आणि जयलक्ष्मी भट्ट, टी. पी. श्रीनिवासन, श्रीहरी भट्ट, चैतन्य अशोक आणि वैष्णवी नांबियार यांनी मनमोहक



सादरीकरण केले. महोत्सवाची सुरुवात आदित्य मोहन यांच्या कन्सर्टने झाली. त्यानंतर भरत कृष्ण, श्याम कृष्ण, अनीश व्ही. भट्ट, गिरीजा शंकर सुंदरशन आणि विभा राजीव यांनीही आकर्षक सादरीकरण केले. जयलक्ष्मी शेखर आणि निवेदिता अरुण यांच्या वीणा कन्सर्टने गोशाळेत संगीत सरिता वाहिली. प्रसिद्ध वीणावादक म्हैसूर आर.के. पद्मनाभ यांच्या सुरेल वादनाने प्रेक्षक भारावून गेले; त्यांना साई गिरिधर (मृदंग) आणि चंद्रशेखर शर्मा (घटम) यांनी अप्रतिम साथ दिली. गुंजिरा वादनात साई भरत तर मुखशंख वादनात गोपी नादलया यांनी कार्यक्रमात रंग भरला. अनसूया पाठक, सर्वेश देवस्तळी, अभिज्ञा राव, शिल्पा पांज, स्नेहा गोमती, श्रीनिधी भट्ट, विभाश्री बैलारे, श्रुती वारिजाक्षन, श्रेया कोळत्ताय, प्रतिक्षा भट्ट आणि कांचना भगिनी यांच्या मैफिली तसेच गोशाळेचे संस्थापक विश्णुप्रसाद हेब्बार यांच्या रचनांचे प्रकाशन अजय मुक्कू यांच्या हस्ते झाले. या महोत्सवात पंडित उमेश चौधरींच्या मंत्रमुग्ध गायनाने गोशाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाले.